सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक -१८७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## १४० कोटी भारतीय आणि..... ट्रम्प टॅरिफला न जुमानता रशियन तेलाची खरेदी सुरूच राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५नवी दिल्ली**

रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून भारत सातत्याने रशियाकडून तेल खरेदी करत आहे. या तेल खरेदीवर रशिया भारताला मोठ्या प्रमाणात सूट देत आहे. अशात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या प्रशासनातील अधिकारी, भारत रशियन तेल खरेदी करून पुतिन यांच्या युक्रेनविरोधातील युद्धयंत्रणेला रसद पुरवत असल्याचा आरोप करत आहेत. याचबरोबर ट्रम्प यांनी रशियन तेलाची खरेदी केल्याबद्दल भारतावर एकूण ५० टक्के कर लादला आहे.



अशात भारताचे रशियातील राजदूत विनय कुमार यांनी म्हटले आहे की, भारतीय कंपन्यांना जिथे जिथे सवलतीच्या दरात तेल मिळेल तिथून तेल खरेदी करत राहतील. याचबरोबर भारत आपल्या ङ्गराष्ट्रीय हिताचेङ्घ रक्षण करणारे उपाय करत राहील.रशियाच्या सरकारी टीएएसएस वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत, कुमार म्हणाले की, भारताची प्राथमिकता देशातील १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे आहे.भारताने सवलतीच्या दरात रशियन कच्च्या तेलाच्या खरेदीवर अमेरिकेने केलेल्या टीकेच्या पार्श्वभूमीवर त्यांचे हे वक्तव्य आले आहे, अमेरिकेची ही टीका भारताने जोरदारपणे फेटाळून लावली आहे.

आम्ही स्पष्टपणे सांगितले आहे की, आमचे उद्दिष्ट भारतातील १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा आहे आणि इतर अनेक देशांप्रमाणेच रशियासोबत भारताच्या सहकार्यामुळे तेल बाजारपेठेत, जागतिक तेल बाजारपेठेत स्थिरता आणण्यास मदत झाली आहेङ्घ, असे विनय कुमार यांनी म्हटल्याचा उल्लेख रशियन वृत्तसंस्थेच्या वृत्तात आहे.

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवरील टॅरिफ दुप्पट करून तब्बल ५० टक्के केले आहे, ज्यामध्ये भारताने रशियन कच्च्या तेलाच्या खरेदी केली म्हणून अतिरिक्त २५ टक्के टॅरिफचाही समावेश आहे, या पार्श्वभूमीवर भारताचे रशियातील राजदूत विनय कुमार यांनी तेल खरेदीबाबत टीप्पणी केली आहे.

## अमित शहा यांचा विरोधकांवर हल्लाबोल
## तुरुंगातून सरकार चालवायचे स्वप्न पाहत आहेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

गृहमंत्री अमित शहा यांनी एएनआयला दिलेल्या खास मुलाखतीत विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. संसदेत नुकतेच मांडलेल्या तीन विधेयकांवर बोलताना त्यांनी १३०व्या घटनादुरुस्ती विधेयकाला विरोधकांचा विरोध म्हणजे केवळ स्वार्थी राजकारण असल्याचे म्हटले.

शहा म्हणाले, हे लोक अजूनही असा विचार करतात की जर ते तुरुंगात गेले, तरी तेथूनच सरकार चालवता येईल. तुरुंगाचेच मुख्यमंत्री व पंतप्रधान निवासस्थान करायचे त्यांचे स्वप्न आहे. तुरुंगातूनच डीजीपी, मुख्य सचिव, कॅबिनेट सचिवांना आदेश देण्याची तयारी हे लोक करत आहेत.



राहुल गांधींवर टीका करताना शहा म्हणाले, ङ्गमनमोहन सिंग यांनी लालू यादव यांना वाचवण्यासाठी आणलेला अध्यादेश राहुल गांधींनी फाडला होता. त्या दिवशी जर नैतिकता होती, तर आज का नाही? की सलग तीन निवडणुका हरल्यानंतर ती नैतिकता संपली आहे?

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या अचानक राजीनाम्याबाबत शहा यांनी सांगितले, ङ्गधनखडजींनी संवैधानिक पदावर राहून उत्तम काम केले. मात्र वैयक्तिक आरोग्याच्या कारणामुळे त्यांनी राजीनामा दिला.

संसद भवनातील सुरक्षा व्यवस्थेबाबत बोलताना शहा म्हणाले, ङ्गसभापती आदेश देतात तेव्हाच मार्शल सभागृहात येतात. डाव्या विचारसरणीच्या काही लोकांनी संसदेत घुसखोरी केल्यानंतर सुरक्षा व्यवस्था बदलणे भाग पडले. पण विरोधकांना फक्त सबबी हव्या आहेत. सलग पराभवांनी निराश झाल्यामुळे ते जनतेत गोंधळ निर्माण करत आहेत.

**रेड्डींवर थेट टीका**

इंडिया ब्लॉकचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांच्यावरही शहा यांनी निशाणा साधला. रेड्डींनी सलवा जुडूम नाकारले आणि आदिवासींच्या स्वसंरक्षणाचा अधिकार रद्द केला. यामुळे नक्षलवाद दोन दशकांपेक्षा जास्त काळ टिकला. विरोधकांनी रेड्डींना निवडताना डाव्या विचारसरणीलाच निकष मानले आहे.

शहा यांच्या या मुलाखतीने संसदेत सुरू असलेल्या विधेयकांवरील राजकीय वादाला आणखी धार मिळाली असून विरोधक आणि सत्ताधारी यांच्यातील संघर्ष आणखी तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.

## आमदार अमित साटम मुंबई भाजपाचे नवे अध्यक्ष, मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५मुंबई**

आमदार आशिष शेलार यांचा मुंबई भाजपा अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर आता भाजपाने आमदार अमित साटम यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत मुंबई भाजपाच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमातून मुंबई भाजपा अध्यक्ष म्हणून अमित साटम यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. यावेळी फडणवीस, चव्हाण व बावनकुळे यांनी साटम यांना पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. अमित साटम अंधेरी पश्चिम मतदारसंघाचे आमदार आहेत. २०१४ पासून ते या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करत आहेत.



याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ङ्गमागील प्रदीर्घ काळापासून आशिष शेलार यांनी भाजपाच्या मुंबई विभागाचं अध्यक्षपद अतिशय समर्थपणे सांभाळलं आहे. २०१७ ची महानगरपालिका निवडणूक, त्यानंतरच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी अतिशय उत्तमपणे काम केलं आहे. मध्यंतरी ते मंत्री असताना मंगलप्रभात लोढा यांनी मुंबई भाजपाचं अध्यक्षपद सांभाळलं. त्यानंतर पुन्हा एकदा आशिष शेमुख्यमंत्री म्हणाले, अमित साटम हे तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. याआधी त्यांनी मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून देखील काम केलं आहे. भाजपात त्यांचा प्रदीर्घ असा कार्यकाळ राहिला आहे. विधानसभेत एक अभ्यासू व आक्रमक असे आमदार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. विशेषतः मुंबईच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. ते प्रश्न सोडवण्यासाठी जी कल्पकता हवी ती देखील साटम यांच्याकडे आहे. मला विश्वास आहे की आता निश्चितपणे येत्या काळात त्यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी मुंबईत आपली घोडदौड कायम राखेल. पुन्हा एकदा मुंबई महानगरपालिकेत महायुतीचीच सत्ता येईल हा विश्वास मला आहे. त्यासाठी सर्व प्रकारच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या ते चांगल्या प्रकारे पार पाडतील.लार यंच्याकडे मुंबईची धुरा सोपवण्यात आली.

मुख्यमंत्री म्हणाले, ङ्गअमित साटम हे तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. याआधी त्यांनी मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून देखील काम केलं आहे. भाजपात त्यांचा प्रदीर्घ असा कार्यकाळ राहिला आहे. विधानसभेत एक अभ्यासू व आक्रमक असे आमदार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. विशेषतः मुंबईच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. ते प्रश्न सोडवण्यासाठी जी कल्पकता हवी ती देखील साटम यांच्याकडे आहे. मला विश्वास आहे की आता निश्चितपणे येत्या काळात त्यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी मुंबईत आपली घोडदौड कायम राखेल. पुन्हा एकदा मुंबई महानगरपालिकेत महायुतीचीच सत्ता येईल हा विश्वास मला आहे. त्यासाठी सर्व प्रकारच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या ते चांगल्या प्रकारे पार पाडतील.

## मनोज जरांगे, तुम्हाला एवढीच जर खाज आहे तर...
### आमदार लाड, दरेकर जरांगेवर भडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईला शिवी दिली. त्यांच्या आईचा अपमान केल्याचे सांगत भाजपच्या नेत्यांनी जरांगेंवर हल्ला चढवला. देवेंद्र फडणवीस यांच्या आईचा अपमान केला, हा कदापि सहन केला जाणार नाही', असा इशारा प्रसाद लाड यांनी दिला. तर आमदार प्रवीण दरेकर यांनीही शरद पवारांचं नाव घेत जरांगेंवर निशाणा साधला.




आमदार प्रसाद लाड म्हणाले, 'मनोज जरांगे पाटील, हा माझा सल्ला समजा किंवा इशारा समजा. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेऊन मराठी आरक्षणाची गोष्ट करत आहात. त्या छत्रपतींनी आपल्याला आयाबहिणींची इज्जत कशी करावी, सन्मान कसा करावा हे शिकवलं.

त्याच छत्रपतींच्या महाराष्ट्रात मराठा आरक्षणाच्या नावाखाली दुकानदारी चालवून तुम्ही ज्या पद्धतीने महिलांचा अपमान करत आहात. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईचा अपमान केला, हा कदापि सहन केला जाणार नाही', असा इशारा प्रसाद लाड यांनी दिला.

एवढीच जर तुम्हाला खाज आहे, तर ज्या शरद पवारांनी तुम्हाला एवढी वर्षे आरक्षण दिलं नाही, त्या शरद पवारांचं नाव का घेत नाही. तुम्हाला निवडणुका आल्या की, राजकीय भांडवल फुगतं आणि आरक्षणाची तुमची नौटंकी सुरू होते. जर तुम्ही याच्या पुढे देवेंद्रजी आणि त्यांच्या आईबद्दल एक अपशब्द जरी बोललात, तर तुम्हाला तुमच्या भाषेत उत्तर द्यायला कमी करणार नाही. हा माझा तुम्हाला इशारा आहे, हे समजून चला', असे आमदार प्रसाद लाड म्हणाले.

सुसंस्कृत महाराष्ट्र जरांगेंना कधीही माफ करणार नाही. डीजेवर बंदी घातली मुंबई उच्च न्यायालयाने, कायद्याची जबाबदारी पोलिसांवर आणि जरांगे घसरतात मुख्यमंत्र्यांच्या आईवर...', असा संताप आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला.

व्यक्तिगत द्वेषाने पछाडलेल्या जरांगेंनी पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांच्या आईचा अपमान केलाय. असे करणारा छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारा असूच शकत नाही. शरद पवारांचं कौतुक करायचं, गुणगान गायचं. पालख्या वाहायच्या आणि दुसऱ्या बाजूला आईवरून शिव्या द्यायच्या, हे कुठलं धोरण?', असा सवाल प्रवीण दरेकर यांनी जरांगेंना केला आहे.

## भटक्या कुत्र्यांचे प्रकरण: सुप्रिम कोर्ट आदेशानंतर केंद्राचे राज्यांना निर्देश; ७० टक्के श्वानांचे लसीकरण अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

भटक्या श्वानांच्या संदर्भातील याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने संबंधित यंत्रणांना स्पष्ट निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर आता केंद्र सरकारने पुढील पावले उचलत देशभरातील राज्य सरकारना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना किमान ७० टक्के श्वानांची नसबंदी आणि लसीकरण करणे बंधनकारक केले आहे. नसबंदी आणि लसीकरण केल्यानंतरच भटक्या श्वानांना पुन्हा मूळ ठिकाणी सोडावे, असे निर्देश



देण्यात आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश देण्यापूर्वी केंद्राची भूमिका केवळ सूचना देण्यापुरती मर्यादित होती, असे सांगितले जात आहे. परंतु, आता या निर्देशासह केंद्र सरकारने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांवर मोठी जबाबदारी टाकली आहे. केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशानुसार, किमान ७० टक्के भटक्या श्वानांची नसबंदी आणि लसीकरण केले पाहिजे. एवढेच नव्हे तर या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक राज्याने दर महिन्याला प्रगती अहवाल सादर करावा, असेही केंद्राने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्र सरकारने निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांना भटक्या कुत्र्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी सोडण्यापूर्वी त्यांचे निर्जंतुकीकरण आणि लसीकरण करण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये किमान ७० टक्के कुत्र्यांचे लसीकरण आणि नसबंदी करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. पशुसंवर्धन मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना एक पत्र पाठवले आहे. या पत्रात सदर निर्देशांचे पालन न केल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.केंद्र सरकारने राज्यांना लिहिलेल्या पत्रात, सुधारित जन्म नियंत्रण मॉडेलला मानक कार्यपद्धती म्हणून लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्देशात प्रमुख शहरांमध्ये नसबंदी आणि लसीकरण प्रयत्नांना अखंडित करण्यासाठी फीडिंग झोन, २४ तास हेल्पलाइन आणि रेबीज नियंत्रण युनिट्स स्थापन करण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट भटक्या प्राण्यांची संख्या नियंत्रित करणे आणि सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे.

## राजकीय नेत्यांना लॉटरी, मुलांसह नातेवाईकांना नवा मद्य परवाना
### ४१ मद्यनिर्मिती उद्योगांना ३२८ नवीन परवाने दिल्याने वाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

राज्याच्या तिजोरीवर येणारा भार कमी करण्यासाठी सरकारने ४१ मद्यनिर्मिती उद्योगांना प्रत्येकी ८ असे ३२८ नवे परवाने देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यातील सुमारे ३० टक्के म्हणजेच ९६ परवाने हे राजकीय नेत्यांच्या कुटुंबीयांशी संबंधितांच्याच झोळीत पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे यात भाजपच्या पाच नेत्यांशी संबंधितांच्या कंपन्या असल्याची बाब समोर आली आहे. या पाच नेत्यांशी संबंधित कंपन्यांना एकूण ४० परवाने मिळणार आहेत. त्यामुळे सध्या राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजपशी संबंधित पाच नेत्यांशी संबंधितांच्या कंपन्यांना एकूण ४० परवाने मिळणार आहेत. यात माजी मंत्री दिवंगत डॉ. बळीराम हिरे यांचे पुत्र प्रसाद हिरे यांची 'डेल्टा डिस्टिलरीज'चा समावेश आहे. त्यासोबत पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांचे पुत्र आर्यमन चारुदत्त पालवे यांची 'रॅडीको



एन.व्ही. डिस्टिलरीज', केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे पुत्र सारंग गडकरी संचालक असलेली 'मानस अॅग्रो इंडस्ट्रीज', 'कराड दक्षिण'चे भाजप आमदार डॉ. अतुल भोसले यांच्याशी संबंधित 'यशवंतराव मोहिते कृष्णा साखर कारखाना' आणि दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांचे पुतणे महेश देशमुख संचालक असलेली 'लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज' यांचा समावेश आहे.

तसेच शरद पवार गटामधील इस्लामपूरचे आमदार जयंत पाटील यांचे पुत्र प्रतीक पाटील अध्यक्ष असलेला 'राजाराम बापू पाटील सहकारी साखर कारखाना'; शिराळ्याचे माजी आमदार मानसिंग नाईक यांची पत्नी, पुत्र व कन्या संचालक असलेली 'विराज अल्कोहोल्स' व पक्षाच्या महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्षा सोनिया होळकर यांचे पती सत्यजित होळकर संचालक असलेली 'ग्रेनॉच इंडस्ट्रीज' या कंपन्यांना पनवान्यांचा लाभ मिळणार आहे. नव्याने परवाने मिळणार असलेल्या ४१ पैकी १६ कारखाने बंद आहेत. तर काहींनी केवळ परवान्यांच्या लाभासाठी नावापुरते कारखाने सुरू ठेवले आहेत. आता सरकारकडून मिळणारे हे नवे परवाने १ कोटी रुपयांमध्ये मिळणार आहेत. ते भाडेकरारावर देण्याचीही सोय असल्याने मद्य उद्योजकांना मोठा आर्थिक लाभ होणार असल्याची चर्चा आहे.

## गणपतीला डीजे नको, बाहेरुन बँड मागवा, पैसे कमी पडले तर माझी बॅग उघडी आहे: संजय शिरसाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५संभाजीनगर**

राज्यातील आगामी गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजे वाजवण्यावर राज्य सरकारने बंदी घातली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमधील गणेश मंडळांना (डीजेऐवजी बँड, बँजो मागवा, असे आवाहन केले. यावेळी संजय शिरसाट यांनी एक मिश्कील टिप्पणी केली. तुम्ही बाहेरुन बँड मागवा, पैसे कमी पडले तर माझी बॅग उघडीच आहे, असे संजय शिरसाट यांनी म्हटले. काही दिवसांपूर्वी संजय शिरसाट हे एका खोलीत बसले असतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओत त्यांच्या खोलीत पैशांच्या नोटांनी भरलेली बॅग दिसली होती. या व्हिडीओ प्रचंड चर्चा रंगली होती. या अनुषंगाने संजय शिरसाट यांनी संभाजीगरमधील कार्यक्रमात मिश्कील भाष्य केले.

अनेकजण वाद सुरु झाला पाहिजे, या मानसिकतेत आहेत. मी सर्व मंडळांच्या अध्यक्षांना विनंती करतो की, आपल्याला डीजे काय करायचाय, आपल्याला चाळीसगावचा बँड मागवा ना, वैजापूरचा बेंजो मागवा. पैसे कमी पडले तर हे सगळे लोक आहेत, असे सांगत त्यांनी व्यासपीठावरील नेत्यांकडे अंगुलीनिर्देश केला.

## संपादकीय ......

# संसदेचे सत्त्व

*संविधानाचा मसुदा दि. ४ नोव्हेंबर १९४८ रोजी सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, भारताचा राष्ट्रपती म्हणजेच 'प्रेसिडेंट' हा देशाचा प्रमुख असेल. अमेरिकेतील राष्ट्रप्रमुखालाही 'प्रेसिडेंट' म्हणण्यात येत असले, तरी या दोहोंत कसलेही साम्य नाही. अमेरिकेची अध्यक्षीय पद्धत चार वर्षांपर्यंत स्थिर शासन देते, तर संसदीय पद्धतीत स्थैर्यापेक्षा संसदेला उत्तरदायी असणे महत्त्वाचे असते. संसदीय शासन पद्धतीत सदस्य प्रश्न विचारून, ठराव करून, स्थगन प्रस्ताव मांडून किंवा अविश्वासाचा ठराव आणून शासनाच्या कृतीचे रोजच्या रोज मूल्यमापन करीत असतात, तर वेळोवेळी होणार्या संसदेच्या निवडणुकांमध्ये मतदार सरकारच्या कामगिरीवर प्रतिक्रिया नोंदवतात.दिवंगत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग सत्तेवर असताना आम्ही म्हणू तसाच जनलोकपाल विधेयकाचा मसुदा मंजूर करा, असा आग्रह अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलकांनी धरला. तेव्हा संसद सर्वोच्च असून कायदा बनवण्याचा अधिकार केवळ संसदेलाच आहे, असे डॉ. सिंग यांनी ठणकावून सांगितले होते. गोपाळ कृष्ण गोखले यांना 'नेक नामदार गोखले' असे म्हणत असत. 'राईट ऑनरेबल' या इंग्रजी शब्दाचे ते मराठी भाषांतर. बि-टिश राज्य असताना भारतात केंद्रीय व प्रांतिक कायदे मंडळे अस्तित्वात आली, तेव्हा सदस्यांच्या नावामागे 'नामदार' शब्द वापरला जात असे. भारतीय संसदेची गौरवास्पद परंपरा असून, देशहिताचे आणि विकासाच्या दृष्टीने मोलाचे असे कायदे संसदेने संमत केले आहेत.अधिवेशनात प्रारंभी विरोधकांनी 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चेची मागणी केली होती; पण त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी विदेश दौर्यावर होते. चर्चेसाठी थोडाही काळ थांबण्याची विरोधकांची तयारी नव्हती. त्यानंतर चर्चाही झाली आणि पंतप्रधानांनी त्यास उत्तरही दिले, तरीही सदस्यांचे समाधान झाले नाही. त्यानंतर बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधकांनी गोंधळ घातला. वास्तविक हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात गेला असून, शिवाय तो राज्याशी संबधित आहे. सरकारतर्फे हे स्पष्ट केल्यानंतरही रोज गोंधळ झालाच.विरोधकांतर्फे सभागृहात अडथळे आणले जात असताना सरकारचा नाईलाज झाला आणि त्यामुळे त्यांनी काम सुरू ठेवले व गोंधळादरम्यान विधेयके मंजूर केली. ती वेळेवर मंजूर करणे, हे लोकहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. गंभीर गुन्हेगारी आरोपांखाली अटक केलेल्या पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद असणारे विधेयक केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मांडले. विधेयकाच्या मसुद्याचा तपशील जाणून न घेता विरोधी पक्षांनी लोकसभेत गोंधळ घालण्यास सुरुवात केली. विधेयकाच्या प्रती टरकावून त्याचे कागद भिरकावून दिले. शेवटी या गदारोळात कायद्याचा मसुदा संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठवला गेला. तासा-तासाला होणार्या कामकाजाच्या तहकुबीमुळे लोकसभेतील ८४ तासांपेक्षा अधिक वेळ वाया गेला.संसद अधिवेशनातील २१ बैठकांमध्ये केवळ ३७ तास आणि ७ मिनिटे कामकाज झाले. खरे तर, अधिवेशनाच्या सुरुवातीलाच १२० तास चर्चा होईल, असा निर्णय घेण्यात आला होता. कामकाज सल्लागार समितीने याबाबत सहमती दर्शवली होती; पण प्रत्यक्षात त्याच्या जेमतेमच कामकाज चालवता आले. राज्यसभेतही केवळ ४१ तास कामकाज झाले. टक्केवारीच्या हिशेबात बोलायचे, तर लोकसभेत २९ टक्के आणि राज्यसभेत फक्त ३४ टक्के कामकाज होऊ शकले. प्रश्नोत्तराच्या तासातील लोकसभेतील कामकाजाचे प्रमाण २३ आणि राज्यसभेतील केवळ ६ टक्के आहे. कामकाजाची टक्केवारी वाढली असती, तर सदस्यांना अनेक उपयुक्त सूचना करता आल्या असत्या आणि त्यानुसार कायद्यात उचित बदल करता आले असते; पण महत्त्वाच्या विधेयकांवर विरोधी सदस्य बोललेच नाहीत.वारंवार आवाहन करूनही आणि चर्चेसाठी पुरेसा वेळ देऊनही त्यांनी सहभाग घेतला नाही. शिवाय एवढे होऊनही बोलायला वेळ मिळत नाही, असे म्हटले जाते. यावर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यसभेतही सदस्यांना २८५ प्रश्न विचारण्याची मुभा होती. तसेच तेवढ्याच संख्येत विशेष उल्लेख तसेच शून्य प्रहरात बोलण्याची संधी होती. त्याअंतर्गत वेळेअभावी चर्चेतून सुटू शकणारे सार्वजनिक हिताचे मुद्दे मांडण्याची संधी याद्वारे मिळते; पण राज्यसभेत फक्त १४ प्रश्न, शून्य प्रहरात ७ मुद्दे आणि ६१ विशेष उल्लेखाचे मुद्दे उपस्थित झाले.*

# विदर्भात बोंडअळीचा प्रादुर्भाव; वेळीच 'हे' उपाय करा वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भातीलकापूस पिकांवर आता गुलाबी बोंडअळीने हल्ला सुरू केला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या आहेत. सततचे ढगाळ हवामान या कीटकाच्या प्रसारासाठी पोषक ठरत असून, वेळीच उपाय न केल्यास मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

कृषी तज्ज्ञांनी वेळेत उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे, जेणेकरून कापूस पिकांचे उत्पादन सुरक्षित राहू शकेल.विदर्भ हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा कापूस उत्पादक प्रदेश मानला जातो. मात्र, गेल्या काही दिवसांपासून गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव शेतकऱ्यांसाठी मोठे डोकेदुखी ठरत आहे. अतिवृष्टी, सततचे ढगाळ हवामान आणि हवामानातील अनिश्चितता या परिस्थितीत या किडीचा प्रसार झपाट्याने वाढतो आहे.

सध्या कापूस पिके ५० ते ६० दिवसांच्या अवस्थेत असून, बहुतेक ठिकाणी फुलोऱ्याची अवस्था सुरू आहे. याच काळात बोंडअळीची वाढ सर्वाधिक होते. वेळीच नियंत्रण न घेतल्यास उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव कसा ओळखावा?**

डोंमकळ्यांच्या स्वरूपात कापूस फुलांमध्ये किडीचे अस्तित्व दिसते.फुलांचा रंग बदलतो व कोवळी बोंडे गळून पडतात.झाडांच्या शेंड्यावर अळ्या दिसू शकतात.तीन दिवसांत ८ ते १० पतंग आढळल्यास त्वरित व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**यांत्रिक उपाय**

शेतातील डोंमकळ्या व अळ्या शोधून नष्ट कराव्यात.

नियमित पिकांचे निरीक्षण करावे.

कामगंध सापळे प्रत्येकी एकरी दोन लावावेत.

**जैविक उपाय**

दर १५ दिवसांनी निंबोळी अर्क (५%) किंवा अझेंडिरेक्टिनची फवारणी करावी.

पीक उगवणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी ट्रायकोग्रामा प्रजातींची अंडी शेतात सोडावीत.

परोपजीवी कीटकांच्या साहाय्याने किडीचे नियंत्रण साधावे.

रासायनिक उपाय

जर प्रादुर्भाव ५% पेक्षा जास्त असेल तर शिफारस केलेली कीटकनाशके वापरावीत.

१०% पेक्षा जास्त प्रादुर्भाव असल्यास मिश्र कीटकनाशकांची फवारणी करून प्रसार रोखावा.

रासायनिक उपायांपूर्वी जैविक व यांत्रिक उपायांना प्राधान्य द्यावे.

**कृषी तज्ज्ञांचा सल्ला**

शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच एकात्मिक व्यवस्थापन (खपींश-सीरींशव झशीीं चरपरसशाशपीं) अवलंबल्यास गुलाबी बोंडअळीमुळे होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येते. हवामानातील बदलामुळे या किडीचा प्रसार झपाट्याने होत असल्याने शेतकऱ्यांनी सतत सर्वेक्षण करणे अत्यावश्यक आहे.

**डॉ. धनराज उंदिरवाडे,** विभाग प्रमुख, कीटकशास्त्र विभाग, डॉ. पं. कृ. वि., अकोला




## छातीत जडपणा आणि डाव्या हाताची वेदना सतावतेय?

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

प्रौढांमध्ये छातीत जडपणा आणि डाव्या हातात वेदना अशा समस्या मोठ्या संख्येने आढळून येतात; मात्र या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच उपचार करणे गरजेचे असते. बर्याचदा ही लक्षणे हृदयाच्या समस्यांमुळे दिसून येतात. म्हणूनच हृदयाच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष देत विलंब न करता त्वरित उपचार करावेत.



बरेच लोक छातीत जडपणा किंवा हाताच्या वेदना, स्नायूंमध्ये ताण येणे यासारख्या किरकोळ समस्या समजून दुर्लक्ष करतात किंवा कधीकधी ॲसिडीटीमुळे छातीत जडपणा जाणवत असल्याचे समजून त्याकडे लक्ष देत नाहीत. दुर्दैवाने ही हृदयविकाराची लक्षणेही असू शकतात आणि उपचारास उशीर करणे धोकादायक ठरू शकते. हृदयाच्या एखाद्या भागात रक्त प्रवाह खंडित झाल्यावर हृदयविकाराचा झटका येतो. शिवाय हृदयविकाराच्या सर्वात सामान्य लक्षणांमध्ये छातीत अस्वस्थता आणि दाब, जडपणा जाणवू शकतो. ही लक्षणे काही मिनिटे टिकून राहू शकतात अथवा थोड्या थोड्या अंतराने अशी लक्षणे आढळून येऊ शकतात.

डाव्या हाताला, खांद्यावर, मानेत, जबड्यात किंवा अगदी पाठीत वेदना आणि अस्वस्थता देखील असू शकते. दम लागणे, मळमळणे, घाम येणे, चक्कर येणे आणि थकवा ही लक्षणे जाणवल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. छातीत जडपणा येणे किंवा हात दुखणे किंवा इतर कोणतीही लक्षणे आढळून आल्यास डॉक्टरांशी संपर्क साधणे आणि लक्षणं समजून घेणे गरजेचे आहे.

लक्षणांकडे करू नका दुर्लक्ष

बरेच लोक अशा लक्षणांवर मदत घेण्यास उशीर करतात. त्यांना वाटते की, ही गॅस, तणाव किंवा स्नायूंमधील वेदनेची लक्षणं आहेत. परंतु, उपचारास जास्त वेळ लागल्याने हृदयाला गंभीर नुकसान होऊ शकते आणि शेवटी मृत्यू ओढावू शकतो. म्हणूनच छातीत किंवा हातातील कोणत्याही असामान्य वेदना या गांभीर्याने घेणे गरजेचे असते. विशेषतः एखादी व्यक्ती वयोवृद्ध असेल किंवा एखाद्यास उच्च रक्तदाब, मधुमेह, उच्च कोलेस्ट्रॉल किंवा हृदयविकाराच्या कौटुंबिक इतिहास असल्यास अशांना याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते.

हृदयविकाराच्या झटक्यानंतर एका तासाच्या आत त्या व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात नेऊन त्यावर त्वरित उपचार करावेत. हृदयविकाराचा झटका आलेल्या व्यक्तीने स्वतः वाहन चालवू नये. आपत्कालीन सेवेशी संपर्क साधून मदत घ्यावी, अशावेळी घाबरून न जाता शांत आणि स्थिर राहणे गरजेचे आहे. कारण, त्यामुळे हृदयावरील दाब कमी होईल. अशा स्थितीत डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय काहीही खाऊ किंवा पिऊ नका. हृदय निरोगी राहण्याकरिता उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल किंवा मधुमेह असल्यास नियमित हृदय तपासणी करणे गरजेचे असते. वेळीच उपचाराने एकाद्याचा अमूल्य जीव वाचविता येतो.

# अमरावतीत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत नागरिकांचा हरित संकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

अमरावती महानगरपालिका, माझी अमरावती फाउंडेशन व सात्विक गणपती यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत आज सकाळी सांस्कृतिक भवन, अमरावती येथे पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.






या कार्यशाळेत प्रथमच नागरिकांना मातीपासून गणेश मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. नागरिकांनी स्वतःच्या हातांनी हरित बाप्पा घडवत पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याचा संकल्प केला. मूर्ती निर्मितीसाठी लागणारे साहित्य महापालिकेकडून उपलब्ध करून देण्यात आले होते.या कार्यशाळेत तब्बल ५०० नागरिकांनी सहभाग घेतला. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत ३५० मातीच्या गणेश मूर्ती घडवल्या. या मूर्ती घरी नेऊन नैसर्गिक रंग वापरून रंगविण्यात येतील व गणेशोत्सवात त्यांची प्रतिष्ठापना केली जाणार आहे.कार्यशाळेत प्रशिक्षकांनी मातीच्या मूर्ती बनवण्याच्या तंत्रज्ञानाबरोबरच शाश्वततेचे महत्त्वही पटवून दिले. प्लास्टर ऑफ पॅरिससारख्या पर्यावरणाला हानीकारक पदार्थांपासून दूर राहून नैसर्गिक माती व रंगांचा वापर करण्याचा संदेश देण्यात आला.यावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून, पर्यावरण संवर्धनाचे भान ठेवत साजरा केल्यास तो सामाजिक जागृतीचेही साधन ठरतो. आपण सर्वांनी मातीच्या मूर्तींचा स्वीकार करून पाणी व पर्यावरणाचे रक्षण करावे.एक जबाबदार नागरिक म्हणून जेव्हा आपण पर्यावरणाचे भान ठेवतो, तेव्हा आपली संस्कृती अधिक समृद्ध होते. चला, या वर्षी आपल्या हातांनी हरित अमरावतीसाठी बाप्पा घडवूया, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, डॉ. सचिन बोंद्रे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सात्विक गणपतीच्या संस्थापक मयुरी खताळे व माझी अमरावती फाउंडेशनचे संस्थापक सार्थक मुंडवाईक यांनी या उपक्रमाचे मार्गदर्शन केले. स्वयंसेवक व नागरिकांच्या सहकार्याने ही कार्यशाळा यशस्वी झाली.

# गणेशोत्सवासाठी सीएसएमटं विशेष २ ट्रेन धावणार २६३

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-** येत्या गणेशोत्सवासाठी अपराक्ती, बडनेरा तसेच जिल्ह्यात परतण्यासाठी तसेच ज्यांना मुंबईतील गणेशोत्सवाचा आनंद घ्यायचा आहे, अशा गणेश भक्तांसाठी मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते नागपूर व नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अशा दोन विशेष ट्रेनची २६ ऑगस्टला सोय केली आहे. २७ रोजी घरोघरी गणराय विराजमान होणार आहेत. गाडी क्र. ०११०१ सीएसएमटी ते नागपूर ही २६ रोजी रात्री १२.३० वाजता निघेल व त्याच दिवशी दुपारी ३.५० वाजता नागपूर येथे पोहोचेल. तसेच गाडी क्र. ०११०२ ही नागपूर येथून सायंकाळी ५.२० वाजता निघून दुसऱ्या दिवशी २७ ऑगस्टला सकाळी ८.२५ वाजता सीएसएमटी स्टेशनवर पोहोचेल. त्यामुळे बडनेरा येथे परतणाऱ्या व येथून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना आता अतिरिक्त पर्याय उपलब्ध झाला आहे.मार्गात ही विशेष ट्रेन वर्धा, धामणगाव रेल्वे, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, ठाणे, दादर येथे थांबा घेईल.एक एसी टू टायर, दोन एसी थ्री टायर, ६ स्लीपर कोच, ७ सामान्य द्वितीय श्रेणी कोच आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणी व गार्ड ब्रेक व्हॅन कोच अशी या विशेष रेल्वेची रचनाआहे. या गाडीचे आरक्षण सुरू झाले आहे. इतर एक्स्प्रेस गाड्यांप्रमाणेच या गाडीच्या अनारक्षित डब्यांमध्ये तिकिटांचा दर ठेवण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांना कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही. तसेच युटीएसद्वारेही या अनारक्षित कोचमधील आसनांचे बुकिंग करता येणार आहे.अमरावती जिल्ह्यातील प्रवाशांची गणेशोत्सवासाठी विशेष ट्रेनची मागणी होती, ती मध्य रेल्वेने पूर्ण केली आहे. ऐन गणेशोत्सवात इतर गाड्यांचे आरक्षण फुल्ल असल्यामुळे अमरावतीसह प्रवाशांना पर्याय उपलब्ध झाला .



# शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याची छत्रपती शेतकरी संघटनाची मागणी

## विभागीय आयुक्त, कृषी उप-संचालकांना निवेदन सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असला तरी नापिकी, कर्जबाजारीपणा, आसमानी व सुलतानी संकटामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. या संदर्भात शासनाचे उदासीन धोरणांमुळे आज शेतकरी नैराशेच्या गर्तेत अडकले असून आत्महत्येस प्रवृत्त झाले आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या अमरावती जिल्ह्यात झाल्या असतांना सुद्धा शेतकऱ्यांना कर्जमाफी व त्यांचा सातबारा कोरा करण्यासंदर्भात विद्यमान सरकारने अजूनही ठोस निर्णय न घेतल्यामुळे शेतकरीवर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर जन आंदोलन उभे करण्यासाठी छत्रपती शेतकरी संघटनेच्या वतीने लढा सुरु करण्यात आला आहे. अशातच शेतकऱ्यांच्या रास्त मागण्या शासन-प्रशासन दरबारी मांडून त्यांना न्याय देण्यासाठी छत्रपती शेतकरी संघटनेच्या वतीने विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रेम जवंजाळ यांनी शेतकऱ्यांच्या निवेदनातून सांगितले कि, लाखो-हजारो शेतकऱ्यांच्या हाताला काम देण्याची क्षमता असलेल्या शेतीव्यवसायाला निव्वळ शेतकरी विरोधी धोरणांमुळे तोट्यात आहे. त्याचाच परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात निराशा निर्माण झाली आहे. त्यामुळे शेती - व्यवसायावर प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष उपजीविका असलेल्या इतर घटकांना सोबत घेऊन शेतकरी व सामान्य माणसाचे जीवन सुखकर व्हावे यासाठी शासन -प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घ्यावी यावेळी शेतकऱ्यांची पूर्णपणे कर्जमाफी करण्यात यावी, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यात यावा , शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव देण्यात यावा, शेतकऱ्यांना बियाणे चांगल्या दर्जाची व योग्य दराने देण्यात यावी, शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यजीवांच्या उपद्रवापासून संरक्षण करण्यात यावे,अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. त्याचबरोबरच छत्रपती शेतकरी संघटनेच्या वतीने याच मागण्यांचे निवेदन कृषी उपसंचालक कृषी विभाग अमरावती पवन देशमुख यांना सुद्धा देण्यात आले. निवेदन देतेवेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रेम जवंजाळ यांचे समवेत विजय लोखंडे , प्रदीप चौधरी,आशिष रघुवंशी, मंगेश देशमुख, राहुल शिंगोले, देवानंद गांजरे, आनंद शिवपेढ, महेंद्र सहारे , मुशाफिर शेख, शेख मुस्ताक, मोहम्मद ईशतियाक,गजानन वळसे, डॉ. चंद्रशेखर गिरी , शरद कोकाटे , रवींद्र वानखडे , प्रदीप पडोळे आदींसह पदाधिकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा
Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण

# गणराया एक काम कर, मोठ्या आवाजाची भिंत आता हद्दपार कर

## अमरावतीतील जेष्ठ नागरिकांचे बाप्पाला साकडे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

गणेशोत्सव म्हणजे आनंद, उत्साह आणि भक्तीचा सोहळा; पण यंदाच्या उत्सवात साताऱ्यातील ज्येष्ठांच्या मनाला एक वेगळीच हुरहूर लागली आहे. हृदयाचे ठोके वाढवणारा आणि कानांना त्रास देणारा डीजेचा आवाज त्यांच्या शांततेला आव्हान देत आहे. म्हणूनच, या वेदनेला वाचा फोडण्यासाठी शहरातील विविध संघटनांच्या सदस्यांनी एकत्र येत आपल्या भावना थेट गणपती बाप्पासमोर मांडल्या. श्यामनगर येथील हनुमान मंदिरात महाआरती करून त्यांनी डीजे बंदीची भावनिक सादही घातली.

गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये घुमणाऱ्या डीजेच्या भीषण आवाजाने ज्येष्ठांची अक्षरशः झोप उडवली आहे. हृदयाचे ठोके वाढवणारा हा आवाज ज्येष्ठांसाठी धोकादायक ठरत आहे. लहान मुलांच्या कानांवरही याचा वाईट परिणाम होत आहे. शांततेत, भक्तिभावाने साजरा होणारा हा उत्सव कर्कश आवाजामुळे एक आरोग्यसंकट बनत आहे. त्यामुळे शहरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध संघटनांनी एकत्र येत डीजे बंदीविरोधी मोहीम सुरू केली आहे.

### प्रशासन आणि मंडळ साथ देतील ?

डीजेचा प्रश्न आता केवळ एका शहरापुरता मर्यादित प्रश्न न राहता, तो एक सामाजिक आंदोलन बनत चालला आहे. आता जिल्हा प्रशासन आणि सार्वजनिक गणेश मंडळांकडून या भावनिक आवाहनाला प्रतिसाद मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. ज्येष्ठांच्या या मागणीला योग्य तो मान मिळून, गणेशोत्सव पारंपरिक आणि आरोग्यपूर्ण पद्धतीने साजरा होईल का? हा प्रश्नच आता सर्वांच्या मनात आहे.



# अंजनगावची पिवळी मारबत ठरली नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी १६**

पुरातन काळात अध्यात्मिक संस्कृतीतील महत्त्वाचा उत्सव मानल्या जाणाऱ्या मारबत पूजनाच्या उत्सव शहरातील कोष्टी समाजाच्या वतीने आज दीडशे वर्षानंतरही तितक्याच भक्तिभावाने साजरा केला जातो. त्यानुसार रविवारी शहरातून मारबत काढण्यात आली. त्यामुळे बघणाऱ्यांना आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

तिसऱ्या चौथ्या पिढीतील युवक दरवर्षी या पिवळ्या मारबत मिरवणुकीचे आयोजन करते. त्यात इतर समाजातील युवकांचाही सहभाग असतो हा उत्सव साजरा करण्यात विदर्भात नागपूर नंतर अंजनगाव सुर्जीचे नाव घेतला जाते. आजच्या प्रगत विज्ञान युगात प्रत्येकाला प्रगतीचे पंख मिळाले असले तरी पुरातन काळाच्या आठवणी आजही जपल्या जातात, त्या काळात संकटाचा सामना करण्यासाठी अध्यात्माची साथ मिळवली जायची आणि त्यातून समाधान अनुभवल्या जात होते. यातूनच मारबत पूजनाचा उत्सव सुरू झाल्याचे सांगितल्या जाते. आज पाचव्या पिढीतही युवक या उत्सवाला येथे मोठ्या भक्ती भावाने साजरा करतात. त्या काळात शारीरिक, आर्थिक, सामाजिक व नैसर्गिक संकट घालवण्यासाठी इडापिडा घेऊन जाय गे मारबत या भावनेतून मिरवणूक काढून मारबत पूजन करण्याची पुरातन परंपरा आजही शहरात दीडशे वर्षानंतर अविरत सुरू आहे.दरवर्षी पोळ्याच्या दुऱ्या दिवशी येथील गुलजारपुरा भागातील हनुमान मंदिरात कोष्टी समाजातील युवक मोठ्या भक्तिभावाने पोळ्याचा सण आटोपताच रात्री पिवळ्या मारबत मूर्तीचे निर्माण करतात व दुसऱ्या दिवशी शनिवारी ट्रॅक्टर ट्रॉलीवर या मारबतला विराजमान करून ढोल ताशांच्या गजरात शहरातून मिरवणूक काढली जाते. या वेळी इडा पिडा घेऊन जाय गे मारबत या घोषणा दिल्या जातात. शहरात ठिकठिकाणी या मारबतचे नागरिकांच्या वतीने पूजन केले जाते. त्यानंतर नंतर मूर्तीचे विसर्जन केले जाते.दरवर्षी शहरवासी या मारबत मिरवणुकीची आतुरतेने वाट पाहात असतात. कोष्टी समाजातील युवकांना या उत्सवासाठी इतर समाजाच्या वतीने सुद्धा सहकार्य लाभते.

या वर्षी शनिवारी ( दि. २३) पिवळ्या मारबतची वाजत-गाजत मिरवणूक शहरातून निघाली. यासाठी गुलजारपुरा येथील रहिवासी राहुल पाटील, सचिन गोखे, अक्षय केवाळे, निखिल ढोरे, आराध्य निमजे, ओम ढोरे, प्रेम राहुल पाटील, योगेश महाजन, नागेश पाटील, दीपक मातीरे, रायांश गोखे, सागर लहाड, नितीन परांडे, हर्षल गुजर, शुभम होरे, अक्षय लहाड, अक्षय गुजर, आकाश होरे, गणेश ढोरे, सचिन गोखे, पंकज गुजर, कपिल माहोरे, वेदांत भुजाडे, सुधीर तायडे, गजू पाटील, बंटी माहोरे, मनीष मेण, मुकेश गुजर, राहुल माहोरे, नितीन भुजाडे यांनी परिश्रम घेतले.

## राजकमल व जयस्तंभ चौका कडे जाणारा

# पूल आजपासून सर्व वाहतुकीसाठी बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती-**

राजकमल व जयस्तंभ चौकातून रेल्वे स्टेशन आणि हमालपुऱ्याकडे उतरणारा रेल्वे उड्डाणपूल आज सोमवार, २५ ऑगस्टपासून सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे. रेल्वे उड्डाणपुलाची अवस्था अत्यंत जर्जर



### हे राहणार पर्यायी मार्ग

वाहतूक बंदी नंतर पायी मार्गाची करण्यात येणार आहे. एसटी व शहर यादीही सदर अधिसूचनेत समाविष्ट बससह इतर जड वाहनांसाठी वाहने हमालपुऱ्याकडून येणारी बसस्टँड मार्गे रेल्वे स्टेशन चौक-मच्क्युरी टी पॉइंट मार्गे पुढे जातील. तर बस स्थानकातून निघणाऱ्या एसटी व शहर बसेसही याच मार्गाचा वापर करतील. दरम्यान राजकमल व जयस्तंभ चौकाकडून येणारी वाहने उड्डाण पुलाऐवजी मालवियचौकातून पुढे रवाना होतील. इतर वाहनधारकांनाही याच पर्यायी मार्गांचा वापर करण्यात येणार आहे.

तरीही या विषयाकडे चालढकल केली जात होती. दरम्यान, सोमवारपासून या पुलावरील सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक बंद करण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला.या पुलाच्या स्ट्रक्चरल ऑडिटनुसार उड्डाणपुलाच्या स्टील गडर्सला जंग झाली असल्याने त्यावरील जड वाहनांची वाहतूक २४ जुलैपासून अचानक बंद केली होती. केवळ दुचाकी, ऑटो आणि कार अशा तीनच प्रकारच्या वाहनांसाठी हा मार्ग खुला होता. मात्र आता सर्वच प्रकारच्या वाहनांसाठी हा मार्ग बंद करण्यात आल्याचे पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी सांगितले. या संबंधीची तातडीची अधिसूचना वाहतूक विभागातर्फे जारी करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी रेल्वे, बांधकाम आणि पोलिस विभागातील अंतर्गत पत्रव्यवहार ही पूर्ण झाला आहे.दरम्यान वाहतूक बंदीच्या अंमलबजावणी साठी पुलाच्या चारही बाजूने बॅरिकेडस् लावण्यात



आले. तसेच अधिसूचनेचे उल्लंघन करू नये म्हणून तेथे पोलिसांचा खडा पहाराही तैनात करण्यात येणार आहे. हा पूल १९८३ मध्ये उभारला आहे. त्या पुलाचे आयुष्यमान संपुष्टात आल्याचा अहवालही यापूर्वीच देण्यात आला असून, त्याठिकाणी नवा पूल बांधण्याचे रेल्वे विभागाने सूचवले आहे. परंतु लागलेला आहे. तसेच डेक स्लॅबमध्ये अनेक ठिकाणी फ्लेक्सरल आणि शीअर क्रॅकिंग आढळले असून, गळतीही लागली आहे. स्टील गर्डर्सना आधार देणाऱ्या ॲब्टमेंटमध्ये गळती यासारख्या गंभीर उणिवाही दिसून आल्या आहेत. त्यामुळे वाहतूक बंदी केली आहे

## राज्यात १७ लाख कर्मचाऱ्यांना बाप्पा पावला!

# राज्यातील सर्व कोषागारे तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणाचे आदेश जारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती:-**

पगारासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना सप्टेंबर महिन्याची प्रतीक्षा करण्याची मुळीचे आवश्यकता नाही. कारण बाप्पाने शासनाला सांगितले असावे, म्हणूनच तर सरकार कर्मचाऱ्यांवर मेहरबान झाले. कर्मचाऱ्यांना गणपतीचे धूमधडाक्यात स्वागत करण्यासाठी अगोदरच वेतन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आता चिंता नसावी, असाच सूर कर्मचाऱ्यांचा उमटला आहे.

राज्य शासनाने यंदापासून गणेश उत्सवाला 'राज्य उत्सव' म्हणून शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे गणपती आणि महाराष्ट्र हे समीकरण हे अख्ख्या जगाला माहिती आहे. बाप्पाच्या आगमनापासून तर विर्सजनापर्यंत १० दिवस म्हणजे महाराष्ट्रात घरा-घरात, गाव-खेड्यात नवचैत्यन्याचा महापूर ओसंडून वाहतो. अगदी घरातील स्वच्छतेपासून तर बाप्पाच्या सजावटीपर्यंत प्रत्येक जण नियोजनात तल्लीन झालेला दिसून येतो. कोकणातील चाकरमान्यांना तर घराकडे सुखरूप जाता यावे, यासाठी रेल्वेच्या विशेष गाड्यांची व्यवस्था केली जाते. महाराष्ट्रात गणपती उत्सव शेकडो वर्षांपासून आनंददायी साजरा होतो. आता तर गणपती उत्सव हा 'राज्य उत्सव' झालेला आहे.शासनाच्या वित्त विभागाने राज्यातील सर्व कोषागारे तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणाऱ्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना त्यांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे वेतन २६ ऑगस्टपर्यंत करण्याचे निर्देश दिले आहेत. याकरिता महाराष्ट्र नियम १९६८ च्या खंड १ मधील नियम क्रमांक ३२८ मधील यापूर्वीची असलेली तरतूद तात्पुरत्या स्वरूपात शिथिल करण्यात आलेली आहे.

### खर्चाचा बसावा मेळ...

महाराष्ट्रात गणरायाचे आगमन म्हणजे स्वर्गसुख मानले जाते. बुधवार, २७ ऑगस्ट रोजी बाप्पाचे आगमन हे चैतन्य निर्माण करणारे आहे. यात यंदापासून शासनानेसुद्धा गणपती उत्सवाला 'राज्य उत्सव' जाहीर केला आहे, तर शासनाने कर्मचाऱ्यांना ऑगस्ट महिन्याचे वेतन सप्टेंबरमध्ये न देता ऑगस्टमध्येच प्रदान करण्याचा आदेश काढला आहे. या निर्णयामुळे शासकीय कर्मचारी आणखी जोशात बाप्पाचे स्वागत करणार, हे मात्र नक्की.

### १७ लाख कर्मचाऱ्यांना बाप्पा गिफ्ट

राज्य शासनाच्या सेवेतील १७ लाख कर्मचाऱ्यांना पहिल्यांदा बाप्पा पावले असे म्हणायला काही हरकत नाही. कारणसुद्धा तसेच आहे.राज्य शासनाच्या वित्त विभागाने २१ ऑगस्ट २०२५ रोजी आदेश जारी करून राज्य सेवेतील कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक, महामंडळे या आस्थापनामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना सप्टेंबर महिन्यात होणारे वेतन ऑगस्टमध्ये देण्याचा निर्णय घेतला आहे. याकरिता शासन निर्णय परिच्छेद १ (१८) मधील तरतूद शिथिल करण्यात आली आहे.

राज्य शासनाने गणपती उत्सव साजरा करण्यासाठी कर्मचाऱ्यांना अगोदर वेतन देण्याचा निर्णय हा अतिशय चांगला आहे. सार्वजनिक किंवा घरगुती गणपती उत्सव हा सर्व समाजाने, एकोप्याने साजरा करावा हाच उद्देश आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांसमोर येणारे आर्थिक संकट काहीसे कमी होणार आहे.

**-डी.एस. पवार,** महासचिव, मध्यवर्ती सरकारी कर्मचारी संघटना.

# अपघात झालेल्या आशा वर्कर ललिता शेळकेचा अखेर मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा :** तालुक्यातील आरोग्य सेवेचा कणा मानल्या जाणाऱ्या आशा वर्करपैकी एक, सेवाभावी कार्यामुळे परिचित असलेल्या सौ. ललिता अतुल शेळके (वय ४५, रा. सुरवाडी खुर्द) यांचे अपघातात निधन झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. २४ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजता नागपूर येथे उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

दि. १६ ऑगस्ट रोजी सौ. शेळके या आपल्या मुलीसोबत घराकडे जात असताना मागून येणाऱ्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली होती. या धडकेत त्यांच्या डोक्याला



गंभीर दुखापत होऊन त्यांना अमरावती व नंतर नागपूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आठ दिवस जीवन-मरणाचा संघर्ष केल्यानंतर अखेर त्यांचे निधन झाले.

सौ. ललिता शेळके या गेल्या अनेक वर्षांपासून आशा वर्कर म्हणून कार्यरत होत्या. गावागावातील माता-बाल संगोपन, लसीकरण, आरोग्य जनजागृतीसाठी त्यांनी स्वतःचे आयुष्य वाहिले होते. शेतकरी कुटुंबातील असलेल्या या कर्मयोगिनीने कठीण परिस्थितीतही सेवाभावाची कास धरली होती. त्यांच्या जाण्याने सुरवाडी खुर्दसह संपूर्ण तिवसा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.सुरवाडी येथील स्मशानभूमीत त्यांच्या अंत्यसंस्कारास गावकऱ्यांसह तालुक्यातील सर्व आशा वर्कर मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या.

# पांढुर्णा येथील ऐतिहासिक गोटमार मेळाव्यात १००० लोक रक्तबंबाळ !

## ४०० वर्षाची परंपरा कायम ; २ जण गंभीर अवस्थेत नागपुर रवाना !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५पांढुर्णा**

दगडफेक हा तसा हिंसक प्रकार असून विदर्भातील ग्रामीण भाषेत त्याला 'गोटमार' असे म्हणतात. परस्परांवर दगडफेकणे हा तसा कायद्यान्वये गुन्हा आहे पण मध्यप्रदेशमध्ये असलेल्या पांढुर्णा या गावात ही दगडफेकच एक परंपरा आहे. दर वर्षी पोळ्याला परस्परांवर दगडफेकले जातात.

ही जवळपास ४०० वर्षे जुनी परंपरा आहे. दरवर्षी भाद्र पक्षातील अमावस्या तिथीला पांढुर्णा येथील जाम नदीवर पोळा सणाच्या दुसऱ्या दिवशी असते. पोळा सणात बैलांची पूजा केली जाते आणि दुसऱ्या दिवशी पांढुर्णा आणि सावरगाव गावातील लोक दिवसभर एकमेकांवर दगडांचा वर्षाव करतात. ज्यामध्ये शेकडो लोक जखमी होतात आणि काहींना प्राणही गमवावे लागतात. दगडफेकीच्या परंपरेला प्रेम कहानीची पार्श्वभूमी आहे.

महाराष्ट्र मध्यप्रदेश सीमेवरील पांढुर्णा येथील विश्वप्रसिद्ध गोटमार मेळावा ऐतिहासिक ठरत असुन मध्यप्रदेशच्या पांढुर्णा येथील गोटमारीला ४०० वर्षाचा इतिहास असून पोळ्याच्या करीला होत आलेल्या ऐतिहासिक गोटमार पाहण्यासाठी महाराष्ट्र मध्यप्रदेश यासह विविध राज्यातील लाखो नागरिक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पांढुर्णा येथे दाखल होतात. जाम नदीच्या



मधोमध पलाश चे झाड ताब्यात घेण्यासाठी हा खटाटोप असतो अखेर पालाश चे झाड ताब्यात घेऊन दोन पक्ष चंडीमातेचे दर्शन घेऊन गोटमार मेळावा समाप्त करतात.

या ऐतिहासिक गोटमारीमध्ये असंख्य भाविक रक्त बंबाळ होत असून सावरगाव व पाढुर्णा या दोन गावाकडुन एक दुसऱ्याला गोटे मारुन नदीपात्रात मध्यस्थळी लावलेला झेंड्यापर्यंत पोहचण्याची शर्यत असते झेंड्यापर्यंत पोहचु नये म्हणुन एक मेकांना गोटे मारल्या जातात या गोटमार मेळाव्यात आतापर्यंत १००० लोक जखमी झाले आहे पैकी २ लोकांना गंभीर अवस्थेत नागपुरला रेफर करण्यात आले आहे. जखमीवर उपचार करण्यासाठी ६ अस्थायी दवाखाने व ५८ डॉक्टर व २०० कम्पाउंडर नेमण्यात आले व बंदोबस्त करण्यासाठी ६०० पोलिस तैनात करण्यात आल्याचे पांढुर्णा येथील जिल्हाधिकारी अजय देव शर्मा यांनी सांगितले.

## आझाद हिंद मंडळ साकारणार
# शिर्डी साईबाबा चा भव्यदिव्य देखावा
### या वर्षीच्या मिरवणुकीत डीजे, लेझर शो नाहीच



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती –** स्थानिक आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावती यंदा ९८ व्या वर्षात पदार्पण करत असताना मंडळाच्या परंपरे नुसार भव्य दिव्य गणेशोत्सव साजरा करणार आहे. मंडळाचा गणेशोत्सव हा संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त आहे. मंडळाने या पूर्वी अनेक भव्य दिव्य देखावे सादर केले आहे. त्या मध्ये लाल किल्ला, ताजमहाल, अक्षरधाम मंदिर, कोणार्क सूर्य मंदिर, स्वामी विवेकानंद स्मारक कन्याकुमारी, अजिंठावेरूळ लेणी, विदर्भातील प्रसिद्ध लासूर मंदिर, पदमनाभ मंदिर, तिरुपती बालाजी मंदिर, पंढरपूर विठ्ठल मंदिर, पंढरपूर वारी देखावा, बारा ज्योर्तीलिंग आदियोगीचा देखावा या सोबतच अनेक सामाजिक तसेच अध्यात्मिक विषयावर देखावे साकारले आहे. तसेच मंडळाच्या गणेशोत्सव मध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधन चे कार्यक्रम मध्ये नाटक, मराठी हिंदी कविसंमेलन, व्याख्याने तसेच देशातील ज्वलन्त विषयावर नागरिक वादविवाद असे भरगच्च कार्यक्रम संपन्न झाले आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलाकार संतोष कनोजीया अकोला व त्यांचे सहकारी मागील २ महिन्या पासून देखावा तयार करण्याचे काम करत आहे.

तसेच अकोला चे गुलाब डेकोरेशन यांची आकर्षक विदुयत रोषणाई राहणार आहे. 'श्री'ची मुर्ती प्रसिध्द मुर्तीकार गजानन सोनसळे यांनी तयार केली आहे. तसेच श्री साईबाबा यांची मुर्ती प्रसिध्द मुर्तीकार सुदाम पाडवार यांनी तयार केली आहे. उत्सवा करिता कोनलाडे मंडप कॉन्ट्रॅक्टर गुप्ता डेकोरेशन, चौधरी डेकोरेशन, शुभम ठाकुर यांची साऊंड सर्विस यांचे सर्वांचं सहकायनि यंदा चा गणेशोत्सव मोठ्या उत्स्साहाने साजरा करण्यात येणार आहे. 'श्री' च्या स्थापने ची भव्य शोभायात्रा बुधवार दिनांक २७ ऑगस्ट ला दुपारी ३.०० वाजता मंडळातून निघणार असून शहरातील मुख्य बाजारपेठेतून परिक्रमा करून परत मंडळात येईल.

तसेच मंडळाच्या शंभर स्वयंसेवकांचे लेझीम पथक, शंभर मुलींचे टिपरी नृत्य, मंडळाचा शंभर महिलांचे पाऊली भजन हे शोभयात्रेचे विशेष आकर्षक राहणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेदरम्यान मंडळाच्या वतीने देण्यात आली.

# शेगावात २८ ऑगस्ट ला 'श्रीं'चा पुण्यतिथी सोहळा
### पाच दिवस राहणार भरगच्च धार्मिक कार्यक्रम





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४शेगाव**
विदर्भ पंढरी शेगाव येथे संत गजानन महाराजांच्या ११५ व्या पुण्यतिथी उत्सव सोहळ्यास रविवार (२४ ऑगस्ट) पासून प्रारंभ झाला आहे. यनिमित्त येत्या २९ ऑगस्ट पर्यंत पाच दिवस दररोज 'श्रीं'च्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २८ ऑगस्ट रोजी हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत 'श्रीं'चा पुण्यतिथी उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा होणार आहे. मंदिरात आजपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सकाळी ७.१५ ते९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ रात्री ८ ते १० हरी किर्तन आयोजित करण्यात आले आहे. उद्या २५ ऑगस्ट रोजी ह.भ.प. भरत बुवा जोगी रा.परळी, २६ ऑगस्ट रोजी ह.भ.प. प्रशांत बुवा ताकोते रा. शिरसोली, २७ ऑगस्ट रोजी ह. भ. प. भरत बुवा पाटील रा. म्हैसवाडी, २८ ऑगस्ट रोजी ह भ प बाळू बुवा गिरगावकर रा.गिरगाव यांचे कीर्तन होईल.

२८ ऑगस्ट वार गुरुवार रोजी ह.भ.प. भरत बुवा पाटील म्हैसवाडीकर यांचे सकाळी ७ ते ९ श्रींचे समाधी सोहळ्या निमित्त कीर्तन होणार आहे. यज्ञ् अन परिक्रमा या उत्सवानिमित्त श्री गणेशयागास व वरूणयागास आज २४ ऑगस्ट रोजी आरंभ झाला आहे २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता यज्ञाची पुर्णाहूती व अवभृतस्नान होईल. दुपारी उत्सवाची पालखीचे श्रींच्या रजत मुखवट्याचे पुजन होवून श्रींच्या पालखीचे रथ, मेणा, पताका टाळकरी, अश्वासह परिक्रमा निघेल. सायंकाळी मंदिरात श्रींची महाआरती व टाळकरी यांचा आकर्षक रिंगण सोहळा व श्रींची आरती होणार आहे. २९ ऑगस्ट रोजी ह.भ.प.प्रमोद बुवा राहणे पळशी यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे कीर्तन होईल व नंतर दहीहंडी गोपाळकाला यांच्या कार्यक्रम होणार आहे. श्रींचे पुण्यतिथी उत्सवानिमित्त श्रींच्या मंदिरावर व परिसरात रंगबेरगी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.सर्वत्र मंदिर परिसरात केळीचे खांब व आंब्याच्या पानांचे तोरण लावण्यात येवून भक्तीमय वातावरण असून श्रींच्या नामघोषात भक्त तल्लीन होत आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा, खानदेश, विदर्भसह मध्ये प्रदेशातील भजनी दिंड्यांचा ज्ञानोबा तुकाराम यांच्या नामघोष करीत संत नगरीत श्रींच्या पुण्यतिथी उत्सवात सहभागी होत आहेत.

भक्तांच्या सोयीसाठी श्रींचे दर्शनसाठी एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यात दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण मंडप, श्रीचे दर्शनाची व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासामध्ये नियमानुसार राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे.भक्तांना कोणताही त्रास होवू नये यास्तव श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत. या उत्सव काळात सर्वतोपरी सोयीसुविधा संस्थानच्या वतीने पुरविल्या जात आहेत.

# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची लालखडी येथील मल शुद्धीकरण केंद्राला भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती–**
अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज लालखडी येथे भुयारी गटार योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या ३०.५० दश लक्ष लिटर व ४४ दश लक्ष लिटर क्षमतेच्या मल शुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. या वेळी त्यांनी केंद्रातील स्वच्छता, यंत्रसामग्रीची कार्यक्षमता तसेच शुद्धीकरण प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्याची सविस्तर माहिती घेतली.

पाहणीदरम्यान आयुक्तांनी अधिकाऱ्यांना केंद्राच्या देखभालीबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या. शुद्धीकरण प्रक्रियेत अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमतेत वाढ करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच, नाल्याचे प्रदूषण कमी होऊन पर्यावरण संवर्धनास हातभार लागावा, यासाठी या केंद्राचे महत्त्व अधोरेखित केले.महापालिकेच्या वतीने नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण रक्षण हे प्राधान्य असून अशा योजनांची अंमलबजावणी सातत्याने सुरू राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या पाहणी प्रसंगी शहर अभियंता रविंद्र पवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे कार्यकारी अभियंता विवेक सोळंके, शाखा अभियंता शि.वा. कुलट, संजय कुलकर्णी, उविअ. स्वप्नील शेंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, अभियंता राजेश आगरकर, आनंद जोशी, जेष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजेश राठोड, नाला शुद्धीकरण केंद्राचे प्रतिनिधी तसेच अभियंते आणि संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# पराभूत का झालो याचा विरोधकांनी अभ्यास करावा
### मतचोरीच्या आरोपावर फडणवीसांची पुन्हा टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर :** मतचोरीवर छाती बडवण्यापेक्षा विरोधकांनी आपण का हरलो, जनतेने आपल्याला का नाकारले याचा अभ्यास करावा, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

लोकसभेचे विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगावर मतचोरीचा आरोप केला होता. तेव्हापासून हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या आरोपाला प्रथम भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून प्रतिउत्तर देण्यात आले, त्यानंतर निवडणूक आयोगानेही राहुल गांधीचे आरोप फेटाळून लावर त्यांना प्रतिज्ञापत्रावर आरोप करण्याचे प्रतिआव्हान दिले होते. त्यानंतर राहुल गांधी यांनी बिहारमध्येही हाच मुद्दा त्यांच्या प्रचार सभांमध्ये आक्रमकपणे मांडणे सुरू केले आहे. आता मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही राहुल गांधीच्या सुरात सूर मिसळून त्यावर भाष्य केले आहे.

यावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या नागपूर दौऱ्यात भाष्य करताना विरोधकांवर टीका केली आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही मतचोरीवर भाष्य केले, यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना विचारले असता त्यांनी गालिबने म्हंटले होते 'दिल बहलाने के लिये खयाल अच्छा है' असे उत्तर दिले. २०१४ मध्ये मोदी जिंकले, त्यापूर्वी तेव्हा काँग्रेसची देशात आणि राज्यात सत्ता होती. जोवर ते आपण का हरलो याचा विचार करणार नाही जनतेने आपल्याला का नाकारले आहे, याचा अभ्यास न करता छाती बडवण्याचा काम करतील.. तोवर हे जिंकणार नाही. तोवर सर्व पक्षांची अवस्था अशीच राहील.

काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी मोदींवर केलेली टीका आम्ही गांभीर्याने घेत नाही,असे ते म्हणाले.लाडकी बहीण योजनेचा सरकारी सेवेतील महिलांनी घेतलेल्या लाभाबद्दल चौकशी होत आहे.. चुकीचे लाभ घेणारे आहेत, त्यांचे लाभ बंद केले जाईल, असे ते म्हणाले. कोण भेटतो यावरुन युती ठरत नाही. राज ठाकरेनी घेतलेल्या भेटीबाबत फडणवीस म्हणाले, राज ठाकरे यांच्या भेटीने लोकांनी संभ्रमित होण्याचे कारण नाही,आमची महायुती अभेद्य आहे.आम्ही महायुती मध्येच लढणार आहोत. आम्हाला कोण भेटतो यावरून युती ठरत नाही, यावरून राजकारण होत नसते,असे मुख्यमंत्री म्हणाले.

# महापालिकेत पाळीव प्राण्यांची नोंदणी करणे आवश्यक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती –** महापालिका हद्दीतील पाळीव प्राणी पाळणाऱ्या सर्व नागरिकांना आता या प्राण्यांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली असून, नोंदणी नसलेल्या प्राणी मालकांविरोधात कारवाई होण्याची तसेच प्राण्यांना ताब्यात घेण्याची मोहीम लवकरच पशुवैद्यकीय विभागामार्फत राबवण्यात येणार आहे. तत्पूर्वी पाळीव श्वान, मांजर, पक्षी यांची नोंदणी त्वरित करून घ्यावी, असे आवाहन मनपाच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत करण्यात आले आहे. क्रमांक ७०६६४४८८६६ जाहीर केला आहे. नागरिकांनी या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

> **टॅगिंग करणे गरजेचे**
> महापालिका हद्दीतील पाळीव प्राण्यांची नोंदणी, टॅगिंग करणे गरजेचे असून, यासाठी शहरवासीयांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. ज्यांनी अद्याप पाळीव प्राण्यांची नोंदणी केली नसेल त्यांनी तत्काळ नोंदणी करावी. –डॉ. सचिन बोंद्र, पशु शल्यचिकित्सक, मनपा.



सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार अमरावती महापालिकेच्या हद्दीत हिसंक श्वान जसे रॉटविलर, बुलटेरिअर, बुलडॉग, पिटबुल, केन कोरसो या जातीचे श्वान पाळण्यास बंदी घालण्यात आई आहे.

**ब्रिडरची नोंदणी नाही केली तर कारवाई होणार**

मनपाच्या हद्दीत अनेक व्यावसायिक श्वान उत्पत्ती व विक्रीचे काम करत असल्याचे आढळून आले आहे. हे काम करताना त्यांच्याकडे भारतीय जीव जंतू कल्याण मंडळाची नोंदणी असणे आवश्यक आहे. श्वान उत्पत्ती व विक्रीचे काम करणाऱ्यांनी

नोंदणी केली नसेल तर त्यांच्याविरोधात भारतीय जीवजंतू कल्याण मंडळाच्या निकषानुसार कारवाई केली जाऊ शकते, अशी माहिती भारतीय जीव जंतू कल्याण मंडळाचे प्रतिनिधी सागर मैदानकर यांनी दिली आहे.

# भरधाव कार पुलावरून ५० फूट खोल नदीपात्रात कोसळली
### मासे आणण्यासाठी भंडाऱ्यात आला अन् जीव गमावून बसला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५भंडारा :** श्रावण मासाची सांगता झाल्यामुळे हॉटेलची दारे उघडण्यापूर्वी मासे आणण्यासाठी पवनी येथे गेलेल्या उमरेड येथील हॉटेल मालकाची भरधाव कार पुलावरून ५० फुट नदी पात्रात कोसळल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. हा अपघात रविवार सकाळी ८ वाजताच्या सुमारास राष्ट्रीय मार्गावरील मरूनदी पुलावर झाला. सागर मधूकर वाघमारे (३०) रा. उमरेड असे मृत हॉटेल मालकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार मृतक सागरचे उमरेड येथे राष्ट्रीय मार्गावर हॉटेल आहे. श्रावणमासाची सांगता झाल्यामुळे रविवारला हॉटलेची दारे उघडण्यापूर्वी सागर हा मासे आणण्यासाठी उमरेड येथून पहाटे ५ वाजताच्या सुमारास आपल्या टाटा हॅरिअर कार क्र. एम.एच. ४० सी.एक्स. ७९२६ ने पवनी येथे आला होता. परतीच्या प्रवासात भरधाव कारवरील नियंत्रण सुटल्याने ही कार अंदाजे पुलावरून ५० फुट खोल नदीपात्रात शिरली. नदीपात्रात पाणी असल्यामुळे सागरचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# नाट्य परिषद करंडक स्पर्धेत २५५ एकांकिका सादर
### अमरावतीत १३ एकांकिकांमध्ये १६५ कलाकारांचे सादरीकरण; १९ केंद्रांवर स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे अमरावतीत नाट्य परिषद करंडक स्पर्धा आयोजित करण्यात आली. हव्याप्र मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेत १३ एकांकिकांच्या माध्यमातून १६५ हून अधिक नाट्यकर्मींनी सहभाग घेतला.

शंभराव्या मराठी नाट्य संमेलनानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. नाट्य परिषदेचे मध्यवर्ती शाखेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा भरवण्यात आली. स्पर्धा शनिवार-रविवार असे दोन दिवस चालली.स्पर्धेत रेणुका पुराणिक यांची 'रानभूल', विनोद सुरोशे यांची 'किसनुमा', हिमांशू इहारे यांची 'वेळ' यांसह एकूण १३ एकांकिका सादर करण्यात आल्या. नागपूरचे देवेंद्र दोडके आणि सोलापूरचे सुधीर गुरव यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

महत्त्वाची बाब म्हणजे ही स्पर्धा एकाच वेळी महाराष्ट्रातील १९ केंद्रांवर घेण्यात आली. राज्यभरात एकूण २५५ एकांकिका सादर झाल्या. या स्पर्धेच्या माध्यमातून ३ हजारांहून अधिक कलावंतांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली.स्पर्धेचे उद्घाटन अमरावती शाखेचे अध्यक्ष ड. चंद्रशेखर डोरले आणि मुंबई नियामक मंडळाचे सदस्य ड. प्रशांत देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. ड. श्रद्धा पाटेकर आणि अभिजीत देशमुख यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. येत्या काही दिवसांत स्पर्धेचा निकाल जाहीर होणार आहे.

# महिला महाविद्यालयामध्ये कै. दादासाहेब खापर्डे यांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती–** स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अंतर्गत येणाऱ्या नूतन कन्या शाळा, न्यू हायस्कूल मेन, न्यू हायस्कूल बेलपुरा व महिला महाविद्यालयामध्ये संस्थेचे आद्य संस्थापक कै. दादासाहेब खापर्डे यांच्या जयंती निमित्ताने दरवर्षी अनेक कार्यक्रम संपूर्ण आठवडाभर आयोजित केले जातात. २७ ऑगस्ट रोजी कै. दादासाहेब खापर्डे यांची जयंती साजरी केली जाते.

या अनुषंगाने यावर्षी देखील महिला महाविद्यालयाच्या वतीने कै. दादासाहेब खापर्डे यांच्या जयंती सोहळ्याच्या अंतर्गत विद्यार्थिनींकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामध्ये वेशभूषा स्पर्धा, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा, तसेच नूतन विदर्भ शिक्षण मंडळांतर्गत येणाऱ्या चारही संस्थेतील शिक्षक कर्मचारी व विद्यार्थिनींच्या एकत्रित रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे आणि विद्यार्थिनींना स्वातंत्र्यसेनानी कै. दादासाहेब खापर्डे यांच्या अलौकिक कार्याची माहिती देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या संपूर्ण कार्यकारिणीचे प्रोत्साहन लाभले आहे. तसेच महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कै. दादासाहेब खापर्डे यांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे.

# घरात नवीन पाहुणा येणार; 'मातृवंदना' पाच हजार देणार

## गर्भवती महिलांनी आरसीएच नोंदणी करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

जिल्ह्यातील मातृवंदना गर्भवती मातांसाठी केंद्र शासनाची प्रधानमंत्री मातृवंदना योजना आरोग्य विभागाऐवजी महिला बालविकास विभागाद्वारे अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून आणखी प्रभावीपणे राबवली जाणार आहे. या बदलामुळे लाभार्थींना नोंदणी आणि लाभ मिळवणे अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान होईल, विश्वास व्यक्त केला जातो. ही केंद्र सरकारद्वारे राबवली जाणारी मातृत्व लाभ योजना असून, याचा उद्देश गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या महिलांना पोषण व आरोग्याचा आधार उपलब्ध करून देणे आहे.आर्थिक मदत तीन टप्प्यांत दिली जाते. गर्भधारणेच्या नोंदणीवर, प्रसूतीपूर्व तपासणीनंतर आणि जन्मानंतर, याआधी आशा वर्करद्वारे राबवली जाणारी नोंदणी आता थेट अंगणवाडी सेविकेकडून केली जाणार आहे. लाभार्थी अंगणवाडी केंद्रातजाऊन फॉर्म भरतील, कागदपत्रे तपासून अर्ज सादर केला जाईल. या प्रक्रियेने नोंदणीची प्रक्रिया गावपातळीवर अधिक सुलभ होणार आहे. योजनेत



पहिल्या अपत्यासाठी ५ हजार रुपये, तर दुसऱ्या अपत्यासाठी, जर मुलगी असेल तर ६ हजार रुपये मदत मिळते. ही मदत थेट बँक खात्यात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरद्वारे दिली जाणार आहे. याचा लाभ हजारो मातांना होणार असल्याने या योजनेचे स्वागत होत आहे. योजनेचा महिलांना लाभ होत आहे.शासकीय दवाखान्यांमध्ये गर्भवती महिलांची नोंद घेतली जाते. त्यानंतर माहिती ऑनलाइन भरल्यानंतर आरसीएच क्रमांक मिळतो.सध्या गर्भवती महिला शासनाकडून विविध सुविधा देण्यात येत आहेत. त्यानुसार गर्भवती महिला आरोग्य सुविधांपासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने आरोग्य सेवांच्या नोंदीसाठी आरसीएच नोंदणी अनिवार्य केली आहे. गर्भवती महिलांनी 'आरसीएच' मध्ये नोंदणीकृत झाल्यानंतरच विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे गर्भवती महिलांनी आरसीएच नोंदणी करणे आवश्यक आहे, असे आवाहन केले आहे.

**कागदपत्रे कोणती आणि कुठे नोंदणी करायची ?**

आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, गर्भधारणेचा वैद्यकीय दाखला, बँक खात्याची माहिती, जन्मनोंदणी प्रमाणपत्र आणि इतर पुरावे यांचा समावेश आहे. अर्ज अंगणवाडी केंद्र किंवा महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयात भरावा.

# 'एमपीएससी'च्या अर्ज प्रक्रियेत मोठा गोंधळ
## शेकडो विद्यार्थ्यांच्या बँक खात्यातून पैसे गायब...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर**




महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा- २०२४ चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. आता मुख्य परीक्षा दिनांक २१ सप्टेंबर रोजी घेण्यात येणार असल्याचेही 'एमपीएससी'ने जाहीर केले आहे. मात्र, मुख्य परीक्षेसाठी अर्ज करण्यास 'एमपीएससी'ने मुदतवाढ दिली आहे. राज्यातील पूर परिस्थितीचा विचार करता हा निर्णय घेण्यात आला असून आता उमेदवारांना २५ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. मात्र, मुदतवाढ दिल्यानंतर विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अर्ज भरताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन माध्यमातून परीक्षेचे शुल्क भरताना त्यांच्या बँक खात्यातून पैसे कापले जात असताना एमपीएससीच्या संकेतस्थळावर मात्र पैसे भरले गेले असे, दाखवत नसल्याने विद्यार्थ्यांची चिंता वाढली आहे.

'एमपीएससी'तर्फे १ जून रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती. निकालाद्वारे मुख्य परीक्षेकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची बैठक क्रमांकासह नावाची यादी व गुणांची सीमारेषा 'एमपीएससी'च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीमध्ये एकूण २६ हजार ७४० उमेदवारांचा समावेश आहे. पूर्वपरीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाइन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्वपरीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी निश्चित केलेल्या कालावधीत अर्ज करणाऱ्या, तसेच परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

# मनोज जरांगेंना बैठक घेण्यासाठी आमदार १०-१५ लाख रुपये देतात; लक्ष्मण हाकेंचा गंभीर आरोप

## अमोल मिटकरी हे अजित पवारांनी विरोधकांवर भुंकण्यासाठी ठेवलेला कुत्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आता २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. त्याआधी बीडमध्ये त्यांनी इशारा सभा घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई येत आहोत, तेव्हा काय करायचे ते करा, असे म्हणत आव्हान केले आहे. आता मनोज जरांगे यांच्यावर ओबीसी नेते लक्ष्मण हके यांनी जोरदार टीका केली आहे. मनोज जरांगेंची मतदारसंघात बैठक घेण्यासाठी आमदार त्यांना १०-१५ लाख रुपये देतात, असा आरोप हाके यांनी केला आहे.

अकोला येथे माध्यमांशी बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मनोज जरांगे यांचा मोर्चा हा सरकार पुरस्कृत आहे, मनोज जरांगेंची मतदारसंघात एक बैठक घेण्यासाठी आमदार त्यांना १० ते १५ लाख रुपये देतात. जरांगेंना आमदार पैसे



देतात, यामुळेच मराठवाड्यातल्या छोट्या छोट्या गावातही जरांगेंची मोठमोठी बॅनर्स आणि पोस्टर्स लागल्याचे हाके म्हणाले.

**आरक्षण घेऊन मराठा समाजाला व्यवस्था हातात घ्यायची**

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, ओबीसीमध्ये आरक्षण घेऊन मराठा समाजाला व्यवस्था हातात घ्यायची आहे. आरक्षणाच्या माध्यमातून नोकरशाहीमध्ये आपली लोक घुसवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यासंदर्भात महाराष्ट्रातील कोणत्याच नेतृत्वाकडून आता अपेक्षा नाही. त्यामुळे यासंदर्भात केंद्रातील ओबीसी नेत्यांना साकडे घालणार असल्याचे हाके यांनी सांगितले आहे.

**मिटकरी हे फार मोठे व्यक्ती नाही**

दरम्यान, यावेळी बोलताना लक्ष्मण हाके यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, मिटकरी हे फार मोठे व्यक्ती नाहीत. अमोल मिटकरी हे अजित पवारांनी विरोधकांवर भुंकण्यासाठी ठेवलेला कुत्रा असल्याचे हाके यांनी म्हटले. तसेच बिग बॉसच्या घरात अमोल मिटकरी चार-पाच तासही टिकणार नाहीत. तिथून बाहेर आल्यानंतर त्यांना काही काम उरणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील काही तमाशा मंडळाना आपण त्यांच्यासाठी सोंगाड्या किंवा ढोलकीवाला म्हणून काम देण्यासाठी? विनंती करणार असल्याचा टोला हाकेंनी मिटकरींना लगावला.

# भातकुली तालुक्यातील माटरगाव-वाठोडा पूल धोकादायक

## प्रशासन झोपेत, नागरिकांच्या जीवाशी खेळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५भातकुली**

अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील माटरगाव-वाठोडा रस्त्यावर असलेला पूर्णा नदीवरील पूल पूर्णपणे धोकादायक अवस्थेत पोहोचला आहे. १९९५ साली उभारण्यात आलेला हा पूल आज भगदाडे, खड्डे आणि तडे यांनी व्यापला असून, नागरिक रोज जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत.

पुलावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. एवढेच नव्हे, पुलाची उंची कमी असल्याने नदीला पूर आल्यावर पुलावरून पाणी वाहते. पुलाच्या खाली अनेक ठिकाणी भगदाड पडल्याने तो कधीही कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.याहून गंभीर बाब म्हणजे, पुलावर सुरक्षा कठडेच नाहीत. त्यामुळे वाहनचालक आणि पादचारी दोघांच्याही जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. तरीदेखील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाकडून याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचा उद्रेक होत आहे.स्थानिक ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर तातडीने पुलाची दुरुस्ती करण्यात आली नाही, तर मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

# अचलपुर मतदारसंघाचा सात कोटीचा निधी मोर्शी-वरुड मतदार संघाच्या घशात

## चांदूरबाजारात केवळ ३ कोटीचे लोखंडी बेंच व सोलर इंडिग्रेटेट डिव्हाईस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ चांदूरबाजार**

तत्कालीन आ. बच्चु कडु यांच्या कार्यकाळात अचलपुर मतदार संघात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (नगर पालीका/नगर परिषद/नगर पंचायत) या योजने अंतर्गत अचलपुर व चांदूरबाजार नगर परिषदे अंतर्गत विविध विकास कामासाठी सन २०२२ मध्ये १० कोटीच्या निधीला मान्यता मिळाली होती.परंतु ११ जुन २०२५ च्या महाराष्ट्र शासनाच्या शुध्दीपत्रकानुसार ९२० लक्ष रुपयाच्या कामाची मान्यता रद्द करुन सुधारीत मान्यते नुसार १० पैकी ७ कोटीची कामे वरुड,मोर्शी नगर परिषदेत व ३ कोटीची कामे चांदूरबाजार नगर परिसदेअंतर्गत करण्याला मान्यता देण्यात आली आहे.याबाबत जनतेत लोकप्रतिनिधिच्या उदासिनते बाबत तिव्र भावना व्यक्त होत आहेत. २८ मार्च २०२२ मधील परिस्छेद ३ (ब ) नुसार अचलपुर व चांदूरबाजार नगर परिषद अंतर्गत १० कोटी एवढ्या किंमतीच्या कामाची थेट शासन स्तरावर निवड करण्यात आली होती.यात अचलपुर नगर परिषद अंतर्गत गांधीपुल ते मारोती संस्थान अचलपुर येथे सापन नदी काठच्या रस्त्याचे विद्युती करणासाठी १०० लक्ष,छत्रपती शिवाजी महाराज पुतळा जयस्तंभ चौक परतवाडा परिसरातील विविध कामासाठी ५० लक्ष, बुन्देलपुरा येथे राम मंदिर जवळ सभागृहाचे बांधकाम ५० लक्ष, जिवनपुरा अचलपुर येथे बालाजी संस्थान जवळ सभागृहाचे बांधकाम ५० लक्ष, जयस्तंभ चौक ते तहसिल कार्यालय अचलपुर रस्त्याच्या दुभाजकाचे काम ५० लक्ष, परतवाडा शहरात विविध ठिकाणी क्रांक्रीट रस्त्याचे काम ५० लक्ष,अचलपुर येथील विविध ठिकाणी क्रांक्रीट रस्त्याचे काम करणे ५० लक्ष, खेल तपमाळी येथे अहिल्याबाई होळकर सभागृहाचे काम ५० लक्ष, अमरावती-परतवाडा मुख्य रस्ता ते गवई यांचे घरापर्यंत क्रांक्रीट नाली व रस्ते बांधकाम ३० लक्ष, अचलपुर येथील सराईपुरा विठ्ठल मंदिरा जवळ सभागृह बांधकाम २० लक्ष असे एकुण ५ कोटीच्या कामाला मान्यता देण्यात आली होती. चांदूरबाजार नगर परिषद अंतर्गत शिवमंदिर पाचपावली मंदिराकडे जाणारा सस्ता व सभागृह बांधकाम ३० लक्ष,चांदूरबाजार दिलालपुर रस्ता बांधकाम ३० लक्ष, तारामाय मंदिर समोर सभागृह बांधणे २० लक्ष, स्टेट बँक ते मुख्य रस्ता सिमेंट रस्ता व नाली बांधकाम ३० लक्ष, जमील कॉलनी अंतर्गत नाली बांधकाम १० लक्ष, पिंपळपुरा येथे अंतर्गत नाली व रस्ते २० लक्ष, महाराणा प्रताप सभागृहाचे उर्वरीत बांधकाम व इतर अनुषंगिक बांधकाम २० लक्ष, न.प. कार्यालय येथे फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करणे १५ लक्ष, टेलीफोन कार्यालय ते उर्दु शाळा कॉंक्रीटीकरण करणे १५ लक्ष, बैलोरा चौक किसान पुतळ्या जवळ सौदर्यीकरण व इतर आधुनिक कामे करणे ३० लक्ष, न.प. उर्दु शाळा वर्ग खोली बांधकाम व इतर अनुषंगिक कामे करणे ५० लक्ष, आठवडी बाजार सौंदर्यीकरण पेविंग ब्लाक व इतर कामे ४० लक्ष, टंडन ते भव्यु पर्यंत सिमेंट रस्ता,पेव्हींग ब्लाक व सौदर्यीकरण १० लक्ष, डॉ.बाबासाहेब उद्यान उर्वरीत सौंदर्यीकरण व इतर कामे ४० लक्ष, न.प. मराठी शाळा मैदान मजबुतीकरण,प्रवेशद्वार,सिमेंट रस्त्यासह इतर कामे ५० लक्ष, नेताजी चौक ते जयस्तंभ चौक सौदर्यीकरण व इतर कामे ५० लक्ष,शिवाजी महाराज पुतळा सौदर्यीकरण व इतर कामे ३० लक्ष, कब्रस्तान समोरील रस्ता बांधकाम १० लक्ष असे एकुण ५ कोटीची कामे चांदूरबाजारात मंजुर झाली होती. ११ जुन २०२५ च्या शासनाच्या शुध्दीपत्रकानुसार ही सर्व कामे रद्द करण्यात येऊन यातील ४ कोटी १० लक्ष रुपयाचा निधी मोर्शी नगर परिषद अंतर्गत विविध कामाकरीता देण्यात आला तर ३ कोटी १० लक्ष रुपयाचा निधी वरुड नगर परिषद अंतर्गत कामासाठी मंजूर करण्यात आला.तर उर्वरीत २ कोटी ५० लक्ष रुपयाच्या निधीत चांदूरबाजार नगर परिषद अंतर्गत पाच प्रभागात ठिकठिकाणी सोलर इंटिग्रेटेड डिव्हाईस व लोखंडी बेंचेस बसविणे हि कामे करण्यात येणार आहे.वास्तविक चांदूरबाजारात यापुर्वीच ठिकठिकाणी लोखंडी बेंचेस बसविण्यात आले होते मात्र आज त्यातील तुरळकच बेंचेस दिसत आहे.अचलपुर मतदार संघातील निधी अन्यत्र वळिवण्यात आल्याची चर्चा जोर धरु लागली आहे.



सदरच्या निधी वळिवण्याशी माझा तिळमात्रही संबंध नाही.सदरचा निधी वळिवण्यासाठी मी कोठेही कोणत्याच प्रकारचा पत्र व्यवहार केला नाही.माझ्या उदासिनतेबाबत जे आरोप करण्यात येत आहे.ते निराधार आहे.अशा आरोपांना हा प्रविण तायडे भीक घालत नाही.आरोप करणा ?यांनी माझे शासनाला दिलेले एक पत्र दाखवून द्यावे.नंतरच आरोप करावे.

**आ. प्रविण तायडे**

# गणेशोत्सवाला अवघे ४८ तास शिल्लक, 'या' २४ तासात पावसाचा जोर वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

गणेशोत्सवाला अवघे ४८ तास शिल्लक असताना पावसाचा जोर वाढला आहे. गणेशोत्सव ची तयारी अंतिम टप्प्यात पोहचली आहे. कोकणचा गणेशोत्सव खास आहे. मात्र, कोकणच्या दिशेने जाणाऱ्यांना या मुसळधार पावसाचा सामना करावा लागत आहे. राज्यात बहुतांश ठिकाणी येत्या २४ तासात पावसाचा जोर वाढणार आहे. या २४ तासात मुंबई, कोकण, उत्तर महाराष्ट्रात पाऊस झोडपणार आहे. आज सकाळीपासून मुंबईत पहाटेपासून मुसळधार पावसाला सुरूवात झाली.



हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील २४ तासांमध्ये उत्तर कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढणार असून, काही भागांमध्ये पावसाच्या तुरळक सरींची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात मराठवाड्यातील काही दुर्गम भागांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असेल असाही प्राथमिक अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. बंगालच्या उपसागरात २६ ऑगस्टपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा नव्याने सक्रिय होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे मान्सूनचा प्रभाव कमी झाला असला तरीही या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम सरींची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

२५ ऑगस्ट ते २९ ऑगस्टपर्यंत राज्यात पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान खात्याने जारी केली आहे. महाराष्ट्रात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात या कालावधीमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील पाच दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार असल्यामुळे नागरिकांनाही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय, मुंबई आणि उपनगरांमध्येही जोरदार पावसाची शक्यता आहे. केंद्रीय हवामान खात्याने २५ ते २९ ऑगस्ट या कालावधीत महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांना मुसळधार पावसाचा हाय अलर्ट जारी केला आहे.

नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. आज मराठवाड्यातील चार जिल्ह्यांसाठी जोरदार पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने जारी केला आहे. जोरदार पावसासह वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, यावर्षी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. राज्यभरात बऱ्याच ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, आता परतीचा पाऊस कधी यावर चर्चा सुरू आहे.

# प्रशासनाचा कोणताही आदेश नसताना साडे तीन वर्षे सांभाळला अतिरिक्त कार्यभार

## साठे तीन वर्षे ग्रामपंचायतचे प्रशासकीय कामकाज असंवैधानिक ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी**

१५ ऑगस्ट तिरंगा झेंड्याची अवहेलना झाल्या बाबत चर्चेत आलेल्या धनेगाव ग्रामपंचायत अतिरिक्त प्रभारी ग्रामसेवक तिरंगा झेंड्याची अवहेलना बाबत जबाबदारी फेटाळून लावल्याने चौकशीच्या घेऱ्यात असताना या प्रकरणाला वेगळेच वळण मिळाले आहे. धनेगाव ग्रामपंचायत येथे अतिरिक्त प्रभारी असलेले ग्रामसेवक प्रविण साखरे यांना पंचायत समिती अंजनगाव सुर्जी प्रशासनाकडून दिनांक २१ डिसेंबर २०२१ ला तात्पुरता सहा महिन्यां करिता अतिरिक्त कार्यभार सांभाळण्यासाठी आदेश देण्यात आला होता. अतिरिक्त कार्यभार आदेश हा सहा महिन्यांसाठी लागू असतो सहा महिन्यांनंतर पुन्हा सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत असते मात्र अतिरिक्त प्रभार सांभाळणारे ग्रामसेवक प्रविण साखरे यांनी सहा महिन्यांनंतर पंचायत समिती प्रशासनाला लेखी स्वरूपात नकळवता साडे तीन वर्षे धनेगाव ग्रामपंचायत अतिरिक्त कार्यभार सांभाळत असल्याचे उघडकीस आल्याने हा कार्यालयीन कारभार असंवैधानिक आहे का ? असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहे. साडे तीन वर्षे अनेक प्रकारचे ठराव घेण्यात आले असून गावातील विकासकामांचे बिल काढण्यासाठी ग्रामसेवक यांची स्वाक्षरी आहे. हा सर्व कारभार असंवैधानिक आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे . पंचायत समिती ते ग्रामपंचायत कार्यालयीन कारभारावर धनेगाव येथिल प्रशासकीय कामकाजात अनुभवी असलेल्या गावातच नेते असताना हा असंवैधानिक कारभार कसा चालू दिला. गावातील नेत्यांची तालुका व जिल्हा प्रशासनावर वचक राहिली नाही का असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत असुन आता या प्रकरणाला कोणते वळण लागणार आहे या कडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे




अंजनगाव सुर्जी पंचायत समितीतील प्रशासकीय कामकाजात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि संबंधित ग्रामसेवकांची चौकशी करुन कारवाई होणे गरजेचे आहे

**सतिश हाडोळे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष**

१५ ऑगस्ट तिरंगा झेंड्याची अवहेलना होणे आणि जबाबदारी फेटाळून लावणे शासकीय सेवकांचा अशोभनीय प्रकार असून या बाबत तिरंगा झेंड्याची जबाबदारी कोणाकडे लेखी स्वरूपात दिली या बाबत चौकशी होणे गरजेचे असुन जिल्हा प्रशासनाने दखल घेणे गरजेचे आहे

**विकास पाटील येवले**
**संचालक कृ. उत्पन्न बा. समिती अं. सुर्जी.**

# प्ले ग्रुप, नर्सरीवर सरकारची राहणार विशेष नजर

## खाजगी पूर्व प्राथमिकच्या शुल्क अनब प्रवेश नियंत्रणासाठी येणार कायदा



अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२४अमरावती

पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खासगी शिक्षण संस्थांच्या शाळा, प्ले ग्रुप, नर्सरी यांच्या शुल्क, प्रवेश प्रक्रियेवर सरकारची नजर राहणार आहे. येथील प्रवेश, अध्यापन दर्जा आणि इतर बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकार नवी कायदा आणणार आहे. यामुळे सुरू असलेल्या सर्व खासगी संस्थांना नोंदणी बंधनकारक होणार आहे. सहा वर्षांखालील मुलांच्या शिक्षण आणि सर्वांगीण विकासाचा उद्देश साधण्यासाठी हा कायदा आणला जाणार असून राज्यातील हा पहिलाच कायदा असणार आहे.

'महाराष्ट्र अर्ली चाइल्डहूड केअर अँड एज्युकेशन' (ईसीसीई) या नावाचा हा कायदा आहे. या कायद्याचा मसुदा सरकारने तयार केला आहे. या कायद्यात 'पूर्व-प्राथमिक शाळा' म्हणजे सहा वर्षांखालील मुलांना शिक्षण देणाऱ्या संस्थांचा समावेश करण्यात आलाय. प्राथमिक शाळांशी संलग्न नसल्या तरी नर्सरी, प्ले ग्रुप, ईसीसीई केंद्रे, ज्युनियर व सीनियर केजीचा समावेश या असेल.

हा मसुद्यावर राज्यातील शालेय शैक्षणिक विभागातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून अभिप्राय मागवण्यात आलाय. जर हा कायदा लागू झाला तर सहा महिन्यांच्या आत सर्व विद्यमान पूर्व प्राथमिक शाळांना सरकारकडे नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे. तसेच कायद्याच्या अमंलबजावणीनंतर सुरू होणाऱ्या नवीन शाळांना पूर्वपरवानगी आणि नोंदणी घेणे बंधनकारक असणार आहे.दरम्यान सरकारच्या अखत्यारीतील अंगणवाडी केंद्रे आणि एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत चालणारी केंद्र या नियमांपासून वगळण्यात आली आहेत. २०२३मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना पूर्व प्राथमिक शिक्षण हे शालेय शिक्षण विभागाशी जोडणे अनिवार्य करण्यात आलंय. नोंदणीकृत ट्रस्ट, संस्था, सहकारी संस्था, भागीदारी फर्म आणि वैयक्तिक नोंदणीकृत व्यक्तींना अशा शाळा सुरू करण्याची परवानगी राहील.

# मेळघाटातील कुलांगणा खुर्दची ४० घरं आजही अंधारात - तिसऱ्या पिढीचा सवाल

## आम्हाला प्रकाश कधी मिळणार?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५मेळघाट

तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागात प्रत्येक घरात वीज पोहोचली, असा दावा सरकार आणि वीज कंपन्या करत असताना, प्रत्यक्षात मेळघाटातील कुलांगणा (खुर्द) गावातील एका वस्तीत आजही तिसरी पिढी अंधारातच जगत आहे. या वस्तीत किमान ४० घरं असून गेल्या ५० वर्षांपासून वीजपुरवठा न झाल्यामुळे ग्रामस्थांचे आयुष्य अक्षरशः काळोखात गेले आहे.



ग्रामस्थांनी सांगितले की, आजवरच्या सर्व लोकप्रतिनिधींनी लवकरच वीज मिळेल अशी केवळ आश्वासनांची पखरण केली. मात्र वास्तवात एकही काम झाले नाही. त्यामुळे आता ग्रामस्थांनी सरळ सवाल केला आहे - आम्हाला अंधारात कुणी ठेवले ? आणि अजून किती काळ ठेवणार ?

या गंभीर प्रश्नाचे उत्तर आणि तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी घेऊन ग्रामस्थ महिला-पुरुष मिळून येत्या २९ ऑगस्ट २०२५ रोजी परतवाडा येथील महावितरण कार्यकारी अभियंता कार्यालयात धडक देणार असून, अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात येणार आहे.

वीज नसल्याने शेतमाल प्रक्रिया, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. या वस्तीतल्या मुलांना दिव्याऐवजी अजूनही कंदील, चुलीच्या उजेडात अभ्यास करावा लागतो. तर महिलांना घरकाम करताना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागते.गावकऱ्यांनी स्पष्ट केले की, यावेळी फक्त निवेदन देऊन थांबणार नाही तर ठोस निर्णय व ठोस आश्वासन मिळेपर्यंत आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# दिव्यांग परीक्षार्थींना मिळाला मोठा दिलासा : आता 'परीक्षा' नाही पाहिली जाणार; लेखनिक मिळणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५अमरावती

स्पर्धा परीक्षेत दिव्यांगांना सोयी-सुविधा नाकारल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे आता स्पर्धा परीक्षांत दिव्यांग पेदवारांना मागणीनुसार लेखनिक व सहायक देणे दिव्यांग कल्याण विभागाने बंधनकारक केले आहे. यामुळे दिव्यांगांना परीक्षा देताना होणारा शारीरिक व मानसिक त्रास कमी होणार आहे. नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार वेगळ्या वैद्यकीय प्रमाणपत्राची गरजही राहणार नाही.लिहिण्यासाठी सक्षम नसणाऱ्या दिव्यांग उमेदवारांना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध परीक्षांसाठी लेखनिक आणि इतर सोयी-सवलती पुरविण्याबाबत सूचनांचे काटेकोर पालन यंत्रणेकडून होत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे दिव्यांग कल्याण त्यामुळे दिव्यांग कल्याण विभागाने नव्याने मार्गदर्शक सूचना निश्चित केल्या आहेत. त्यानुसार दिव्यांग उमेदवाराने मागणी केल्यास लेखनिक, वाचक, प्रयोगशाळा सहायकांची सुविधा देणे संबंधित परीक्षा यंत्रणेस अनिवार्य आहे. यामुळे स्पर्धा परीक्षा देताना दिव्यांगांची



गैरसोय होणार नाही. यापूर्वी यंत्रणेकडून दिव्यांगांची परीक्षा देताना हेळसांड होत होती त्याला आता कुठेतरी लगाम बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.दिव्यांगांचे केंद्र दुसऱ्या अथवा तिसऱ्या माळ्यावर असल्यास त्यांना चढ-उतार करताना कमालीचा त्रास होतो. ही गैरसोय टाळण्यासाठी परीक्षा केंद्र शक्यतो तळमजल्यावरच ठेवण्याचे दिव्यांग कल्याण विभागाने सुचविले.आपत्कालीन परिस्थितीत लेखनिक, वाचक, प्रयोगशाळा सहायक परीक्षेसाठी उपलब्ध न झाल्यास लेखनिक बदलण्याच्या प्रक्रियेत लवचिकता असावी, त्या दृष्टीने परीक्षा यंत्रणेने परीक्षा केंद्रावर राखीव लेखनिकाची व्यवस्था करावी, एका विषयासाठी एकच लेखनिक, वाचक, सहायक वापरता येईल, अशा विविध प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे नाही

अंधत्व, शारीरिक दिव्यांगत्व या दिव्यांगत्वाच्या प्रकारातील लक्षणीय दिव्यांगत्व असल्यास परीक्षार्थीना त्याची इच्छा असल्यास लेखनिक, वाचक, प्रयोगशाळा सहायक उपलब्ध करून द्यावे लागणार आहे. त्यासाठी प्रमाणिक केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

# पोटातील गुडगुड थांबणार, आता शाळेतच जंतनाशक गोळी मिळणार

## वेळापत्रक लवकरच येणार : जंतदोष निवारण्यासाठी आरोग्य विभागाचा उपक्रम




विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५अमरावती

मुलांमधील जंतदोष निवारण्यासाठी आरोग्य विभागामार्फत दरवर्षी शाळांमध्ये जंतनाशक गोळ्यांचे वितरण करण्यात येते. यंदाही सप्टेंबर महिन्यात शाळांमध्ये जंतनाशक गोळ्यांचे वितरण करण्यात येणार आहे.

खानपानद्वारे विविध प्रकारचे जंतू लहान मुलांच्या पोटात जातात. या जंतूंमुळे अन्नातील पौष्टिक तत्त्व मुलांच्या शरीराला मिळत नाहीत. त्यामुळे मुलांचा शारीरिक विकासही खुंटतो, तसेच विष्ठेद्वारेही जंत बाहेर पडू लागतात. त्यामुळे मूल आजारी राहते. राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेअंतर्गत १९ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेतच गोळ्या दिल्या जाणार आहेत.

दरवर्षी शाळा सुरू झाल्यानंतर साधारणतः ऑगस्ट-सप्टेंबर आणि फेब्रुवारी-मार्च महिन्यात शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे मुलांमधील कुपोषण, पोटदुखी, मळमळ, अतिसार आणि रक्तक्षय यावर नियंत्रण मिळवणे हा आहे. यंदा सप्टेंबरमध्ये गोळ्या वाटप होण्याचे संकेत आहेत.लहान मुले बऱ्याचदा अतिगोड खातात तसेच स्वच्छता ठेवण्याकडेही दुर्लक्ष होते. दरम्यान, बालकांच्या पोटात जंतदोष निर्माण होतो. हा जंतदोष दूर करण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या जंतनाशक गोळ्या योग्यरित्या सेवन करणे गरजेचे आहे, असे जि.प. च्या माता व बाल संगोपन अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली देशभर ही मोहीम राबवली जाते. शाळा व अंगणवाडी केंद्रांतून मुलांना जंतनाशक गोळ्या वाटप केल्या जातात.पोटातील जंत काढून टाकण्यासाठी ही गोळी उपयुक्त आहे. जंतांमुळे होणारे कुपोषण, वाढ खुंटणे, पोटात दुखणे, रक्तक्षय यावर नियंत्रण मिळते. यासाठी गोळ्यांचे सेवन करणे गरजेचे आहे.पोटात वारंवार दुखणे, भूक न लागणे, अतिसार व मळमळ, शरीरात दुर्बलता, रक्तक्षय व कुपोषण आदी समस्या निर्माण होतात.हे सर्व दोष नष्ट करण्यासाठी १९ वर्षाच्या आतील सर्व बालकांनी जंतनाशक गोळ्यांचे सेवन करणे गरजेचे आहे, असे जि.प. चे माता व बाल संगोपन अधिकारी यांनी सांगितले.

### शासकीय रुग्णालयांत मिळतेय गोळी मोफत

शासकीय रुग्णालयांतही जंतनाशक गोळी मोफत मिळते. ज्या विद्यार्थ्यांना शाळेतून गोळी मिळणार नाही, त्यांना जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा जिल्हा रुग्णालयात जाऊन मोफत गोळीचा लाभ घेता येईल.

### या वेळचे वेळापत्रक काय ?

जंतनाशक गोळ्या वितरणाचे वेळापत्रक अद्याप वरिष्ठ स्तरावरून जिल्हास्तरीय आरोग्य यंत्रणेला मिळालेले नाही. सप्टेंबर महिन्यात जंतनाशक गोळी वाटप मोहीम असू शकते, असा अंदाज वर्तविला जात आहे.

# यंदा बाप्पाच्या स्थापनेसाठी दिवसभर शुभ मुहूर्त ; तर गौरींचे आगमन सहापर्यंत

## गौरी, गणपतीच्या आराधनेसाठी भाविकांकडून जय्यत तयारी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५अमरावती

मागे कलर बॉक्स टाकणे महाराष्ट्राचे पध्य दैवत बाप्पा अर्थात गणरायाचे घराघरांमध्ये अनब चौका चौकांतील मंडपात बुधवार, २७ ऑगस्ट रोजी आगमन या होणार असून, चैतन्यदायी उत्सवासाठी गणेश भक्त सज्ज झाले आहेत. गणेश चतुर्थीच्या दिवशी 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना दिवसभरात कधीही केली तरी चालेल; पण गौरींचे आवाहन अनुराधा नक्षत्राच्या मुहूर्तावर होणार असल्याने ते रविवार ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:२७ वाजतापर्यंत करावे, असे पंचांग तज्ज्ञांचे म्हणणे आहे.गणेश चतुर्थीला 'श्री'च्या प्राण प्रतिष्ठापनेला कोणता निश्चित मुहूर्त नसला तरी घरांमध्ये ती दुपारी दीड वाजेपर्यंत करायला हवी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मंडपामध्ये त्या दिवशी कधीही प्रतिष्ठापना करता येईल. गणरायाचं विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी ६ सप्टेंबर रोजी होणार आहे.

गौरी, गणपतीची प्रतिष्ठापना आणि धार्मिक पूजा, अर्चा व विधीच्या निमित्ताने महिलांकडून आतापासूनच तयारी केली जात आहे. यामध्ये विविध साहित्याची जुळवाजुळव, घराची स्वच्छता, सजावट व विद्युत रोशनाई व मंडपाबाबतचे नियोजन केले जात आहे.



गणेशोत्सवानंतर ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजून ३७ मिनिटांनी खग्रास चंद्रग्रहण सुरू होणार आहे. ग्रहणाचा काळ सुरू होण्यापूर्वी मूर्तीचे विसर्जन करणे कधीही चांगले असते त्यामुळे अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी होणाऱ्या या ग्रहणामुळे गणेश विसर्जन लवकर करावे.

**समीर जोशी , पंचांग तज्ज्ञ,अमरावती**

### कधी कराल गौरीचे पूजन अनब विसर्जन ?


या अनुराधा नक्षत्राला ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:५२ वाजतापर्यंत गौरी आवाहन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पूजनाला कोणताही मुहूर्त नाही; पण ती एकटी येत नाही तर त्या दोघी बहिणी येतात, म्हणून त्यांना ज्येष्ठा आणि कनिष्ठा गौरी म्हणतात. गौरी ही गणपतीची आई म्हणजे पार्वती माता आणि माता लक्ष्मीची थोरली बहीण मानली जाते. प्रत्येक घरात आपापल्या चालीरिती, कुळधर्म-कुळाचार यांचे पालन करून गौरी आवाहन, पूजन आणि विसर्जन २ सप्टेंबर रोजी मूळ नक्षत्राच्या मुहूर्तावर रात्री ९:५१ वाजेपर्यंत करता येईल.

# बॉम्बे हायकोर्टाचा आदेश धाब्यावर : अमरावतीत मॉलमध्ये बेकायदेशीर पार्किंग शुल्क

## ग्राहक परिषदेची मनपा आयुक्तांकडे तक्रार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५अमरावती ४२,४३

अमरावती शहरातील मॉल, मल्टिप्लेक्स व शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये ग्राहकांकडून बेकायदेशीरपणे पार्किंग शुल्क वसूल केल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्राहक परिषद सदस्य समीर जवंजाळ यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन सादर करून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.जवंजाळ यांनी निवेदनात




नमूद केले आहे की, नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी घेताना अशा इमारतींना पार्किंगसाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे व ती जागा ग्राहकांसाठी मोफत असणे अपेक्षित आहे. मात्र वास्तवात तापडिया मॉलसह



शहरातील अनेक मॉल व मल्टिप्लेक्समध्ये नागरिकांकडून अनधिकृतरित्या पार्किंग शुल्क आकारले जात आहे.ग्राहक शुल्क टाळण्यासाठी मॉलसमोरील मुख्य रस्त्यावर वाहन उभी करतात. त्यामुळे वाहतूक कोंडी व अपघातांचा धोका वाढला आहे. तरीदेखील महानगरपालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.निवेदनात बॉम्बे हायकोर्ट नागपूर खंडपीठाचा सागर सत्यवान पोपले विरुद्ध नागपूर महानगरपालिका (२०१९) निकाल व सर्वोच्च न्यायालयाचा M.C. Mehta vs Union of India (2006) निकालाचा दाखला देत पार्किंग शुल्क आकारणी बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# अमरावतीत विक्रमी ट्रॅफिक जाम : जिल्हा सामान्य रुग्णालयापासून सिटी कोतवाली पोलिस ठाण्यापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५अमरावती

अमरावती शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच तब्बल एक किलोमीटरपर्यंत ट्रॅफिक जाम झाल्याची धक्कादायक घटना आज घडली. जिल्हा सामान्य रुग्णालयापासून थेट सिटी कोतवाली पोलिस स्टेशनपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, नागरिक तासनतास या जाममध्ये अडकून पडले आहेत.

यामागचे मुख्य कारण म्हणजे रेल्वे स्टेशन परिसरातील ब्रिटिशकालीन पूल बंद करण्यात आलेला आहे. हा पूल धोकादायक







स्थितीत असल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून वाहतुकीसाठी बंद केला. मात्र या निर्णयानंतर शहराच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली.मुख्य बाजारपेठेकडे जाणाऱ्या रस्त्यावर रुग्णवाहिका, शालेय बसेस, दुचाकी, चारचाकी आणि मालवाहतूक वाहनांचा अक्षरशः ठप्पावलेला ताफा पाहायला मिळाला. विशेषतः रुग्णालयाकडे जाणाऱ्या रुग्णवाहिका जाममध्ये अडकल्या असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.दरम्यान, नागरिकांना झालेल्या या प्रचंड मनस्तापामुळे वाहतूक विभाग आणि महापालिका प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रेल्वे पुल बंद केल्यानंतर पर्यायी मार्गांची योग्य सोय का करण्यात आली नाही, असा सवाल नागरिक करत आहेत.शहरात निर्माण झालेल्या या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत असून, वाहतूक विभाग नेमका काय तोडगा काढतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.अमरावतीतील या विक्रमी जामने शहरवासीयांना अक्षरशः हैराण केले असून, प्रशासनाने यावर तातडीने पावले उचलली नाहीत तर येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.